सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ०६ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १६५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# कांद्याचे भाव वाढल्यानंतर सरकारचा मोठा निर्णय

नवी दिल्ली : सध्या बाजारात सर्वच भाजीपाल्यांचे दर वाढत आहेत. अशातच कांद्याचे दरसुद्धा वाढले आहेत. ज्या शेतकऱ्यांकडे कांदा आहे, त्या शेतकऱ्यांना याचा चांगला फायदा होत आहे. मात्र, कांद्याचे दर वाढत असताना सरकारनं दुसऱ्या बाजूला मोठा निर्णय घेतला आहे. सरकारनं कांद्याचे दर कमी करण्यासाठी हालचाली सुरु केल्या आहेत. सरकार आता दिल्ली-एनसीआरमध्ये ३५ रुपये किलो दराने कांद्याची विक्री करणार आहे. ग्राहकांना दिलासा देण्यासाठी वाढत्या दरातून सरकारनं हा मोठा निर्णय घेतला आहे.

दिल्ली आणि लगतच्या शहरात कांदा ६० रुपये किलोवर

कांद्याच्या दरात दिल्ली-एनसीआरमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या ठिकाणांना दिलासा देण्यासाठी सरकारनं आता कमी दरात कांद्याची



विक्री करण्याचा निर्णय घेतला आहे. तेथील ग्राहकांना यामुळं मोठा दिलासा मिळणार आहे. राष्ट्रीय राजधानी आणि लगतच्या शहरांमध्ये कांद्याचा भाव ६० रुपये किलोवर पोहोचल्यानंतर केंद्र सरकारने स्वत:हून सवलतीच्या दरात कांदा विकण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकार आता या भागात ३५ रुपये किलोने कांदा विकणार आहे. बाजारातील भाव मोडीत काढणे हे सरकारचं उद्दिष्ट आहे.

दिल्ली-एनसीआरमध्ये आजपासून कांद्याची विक्री सुरु

दरम्यान, दिल्ली-एनसीआरमध्ये सरकार आजपासून कांद्याची विक्री सुरू करणार असल्याची माहिती केंद्र सरकारने दिली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाने यासाठी नाफेड आणि एनसीसीएफला आदेश दिले आहेत. सर्वसामान्यांना हे दोन्ही सरकारी युनिट ३५ रुपये किलो दराने कांदा उपलब्ध करून देणार आहेत.

एनसीसीएफ आणि नाफेडच्या माध्यमातून कांद्याची विक्री

नाफेड आणि एनसीसीएफ या दोन्ही सरकारी संस्था सर्वसामान्यांना सरकारच्या वतीने स्वस्त दरात खाद्यपदार्थ उपलब्ध करून देण्याचं काम करतात. या दोन्ही संस्था मध्यवर्ती दुकाने, मोबाईल व्हॅन आणि इतर माध्यमातून सवलतीच्या भावात खाद्यपदार्थ लोकांपर्यंत पोहोचवण्याचं काम करतात. गतवर्षी देशभरात कांद्याचे आणि टोमॅटोचे भाव प्रचंड वाढले असताना सरकारने नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून लोकांना स्वस्त दरामध्ये टोमॅटो आणि कांदे उपलब्ध करून दिले होते.

डाळीसह तांदळाची देखील स्वस्त भावात विक्री

महागाईपासून सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी सरकार विविध निर्णय घेत आहे. सरकार सध्या स्वस्त दरात पीठ, डाळ, तांदूळ विकत आहे. गेल्या वर्षीच सरकारने 'भारत' या ब्रँड नावाने बाजारात पीठ, डाळी आणि तांदूळ आणले होते.

## तेलंगणात सहा नक्षलवाद्यांना कंठस्नान

हैदराबाद : तेलंगणातील भद्राद्री कोथागुडेम येथे आज, गुरुवारी पोलीसांशी झालेल्या चकमकीत ६ नक्षली ठार झाले असून चकमकीदरम्यान २ पोलीस कर्मचारीही जखमी झाले. यातील एकाची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरु असल्याची माहिती पोलिस सुत्रांनी दिली आहे. कारकागुडेम मंडलातील रघुनाथपालेमजवळील जंगल भागात पोलिसांच्या कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान ही चकमक झाली. दोन दिवसांतील ही दुसरी मोठी कारवाई आहे. छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांनी दंतेवाडा आणि विजापूरच्या सीमेवरील जंगल परिसरात केलेल्या नक्षलविरोधी कारवाईत ९ नक्षलवाद्यांना ठार केले होते. यानंतर दोनच दिवसांनी ६ नक्षल्यांना ठार करण्याची घटना घडली आहे. या संयुक्त मोहिमेमध्ये विविध विभागातील विविध सुरक्षा तुकड्यांचा समावेश होता.

# हायकोर्टाची विकिपीडियाला अवमानना नोटीस

## वृत्तसंस्थेसंदर्भात खोडसाळ माहितीचे प्रकरण

नवी दिल्ली : एका वृत्तसंस्थेच्या संदर्भात चुकीची आणि खोडसाळ माहिती प्रसारित केल्याप्रकरणी विकिपीडियाच्या विरोधात मानहानीचा खटला दाखल केलाय. याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने विकिपीडियाला आज, गुरुवारी अवमानना नोटीस बजावली आहे.



काही अज्ञात लोकांनी विकिपीडियावरील पेजमध्ये वृत्तसंस्थेच्या संदर्भात आक्षेपार्ह माहिती टाकली होती. याचिकाकर्ती वृत्तसंस्था सरकारच्या प्रचाराचे साधन आहे, असा बदल त्यात केला होता. यानंतर न्यूज एजन्सीने तक्रार दाखल केली होती. न्यायालयाने विकिपीडियाला पेज एडीट करणाऱ्या लोकांची माहिती देण्याचे आदेश दिले होते, परंतु विकिपीडियाने आदेशाचे पालन केले नाही, यामुळे वृत्तसंस्था पुन्हा उच्च न्यायालयात पोहोचलीआणि न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाल्याचे सांगितले. याप्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती नवीन चावला यांनी विकिपीडियावर तीव्र आक्षेप व्यक्त केला. कोर्ट म्हणाले की, तुम्हाला भारत आवडत नसेल, तर कृपया भारतात काम करू नका. आम्ही सरकारला विकिपीडिया भारतात ब्लॉक करण्यास सांगू. अशा कठोर शब्दात न्यायालयाने आपली नाराजी व्यक्त केली.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने आदेशाचे पालन का केले नाही..? अशी विचारणा विकिपीडियाला केली. न्यायालयाने यापूर्वीच विकिपीडियाला न्यूज एजन्सीच्या पेजमध्ये बदल करणाऱ्यांची नावे विचारली होती. पण, अद्याप ही नावे समोर आलेली नाहीत. यावर विकिपीडियाच्या वकिलाने सांगितले की, संस्थेचे बेस भारतात नाही, त्यामुळे त्यांच्या अधिकाऱ्यांना न्यायालयात हजर राहण्यास वेळ लागेल. त्यावर नाराजी व्यक्त करत न्यायालयाने अवमानाचा गुन्हा दाखल करणार असल्याचे सांगितले. न्यायालय म्हणाले की, विकिपीडियाचा बेस भारतात आहे की नाही हा प्रश्न नाही, तर न्यायालयाच्या आदेशाचे पालन का झाले नाही, हे महत्त्वाचा आहे. आम्ही सरकारला सांगून भारतात तुमचे काम बंद करू, तुमचे व्यावसायिक व्यवहार बंद करू, असा इशाराही न्यायालयाने दिला. आता या प्रकरणाची सुनावणी ऑक्टोबर महिन्यात होणार आहे.

# खा. राहुल गांधींनी केले दिवंगत वसंत चव्हाण कुटुंबियांचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, ०५ सप्टेंबर-**

लोकसभा विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी व काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खा.मल्लिकार्जुन खरगे यांनी गुरुवारी नायगांव येथे भेट देवून नांदेड लोकसभा मतदार संघाचे दिवंगत खा.वसंतराव चव्हाण यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.नांदेड लोकसभा मतदार संघाचे खा.वसंतराव चव्हाण यांचे २६ ऑगस्ट रोजी हैद्राबाद येथील रुग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले होते.या दुःखद घटनेनंतर राज्यातील विविध पक्षांच्या अनेक प्रमुख नेत्यांनी नायगांव येथे धाव घेत स्व.खा.वसंतराव चव्हाण यांच्या कुटुंबियांची भेट घेतली होती.

दरम्यान गुरुवारी लोकसभेचे विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी



व काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे नायगांव येथे येवून दिवंगत खा.वसंतराव चव्हाण यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.यावेळी प्रा.रवींद्र चव्हाण, रंजीत चव्हाण व कुटुंबातील सदस्यांशी भावनिक संवाद साधत काँगेस पक्ष आपल्या पाठीशी असल्याचे खा.राहुल गांधी म्हणाले. काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आस्थेवाईकपणे चव्हाण कुटुंबाची विचारपूस केली.या दुःखात आम्ही आपल्या सोबत आहोत. असा धीर खा.राहुल गांधी व मल्लिकार्जुन खरगे यांनी चव्हाण कुटुंबाला दिला.

याप्रसंगी काँगेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेना खासदार नागेश पाटील आष्टीकर, आ.अमित देशमुख, आ.मोहन हंबर्डे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष हणमंत बेटमोगरेकर, शिवसेना सहसंपर्क प्रमुख दत्ता पाटील कोकाटे, जिल्हाप्रमुख बबन बारसे आदींची उपस्थिती होती.

यावेळी देगलूर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार, पोलीस निरीक्षक चिंचोलकर, पोलीस निरीक्षक गढवे, रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि श्रीधर जगताप पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे, पोलीस उपनिरीक्षक परगेवार यांनी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

उदगीर (जि. लातूर) येथील तळवेस परिसरातील नवनिर्मित विश्वशांती बुद्ध विहाराचे राष्ट्रपती द्रौपदीमुर्मू यांच्या हस्ते लोकार्पण झाले. या कार्यक्रमास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, पालकमंत्री गिरीष महाजन, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे उपस्थित होते.

## कोरोना लसीमुळे १२ जणांचा मृत्यू : हेमंत सोरेन

रांची : झारखंड येथे पोलिस भरती दरम्यान झालेले १२ उमेदवारांचे मृत्यू कोरोना प्रतिबंधात्मक लसीमुळे झाल्याचा खळबळजनक आरोप मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी केलाय. या घटनेसाठी सोरेन यांनी केंद्र सरकारला जबाबदार धरले आहे. हेमंत सोरेन बुधवारी ४ सप्टेंबर रोजी रांची येथे आयोजित मईया सन्मान योजनेच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी पोलिस भरतीसाठी शारिरीक चाचणीदरम्यान १२ उमेदवारांच्या झालेल्या मृत्यूवर भाष्य केले. सोरोन म्हणाले की, त्यांचा मृत्यू फक्त धावण्यामुळे झालेले नाहीत. लोक चालता चालता मरत आहेत. कोरोना काळात त्यांनी चुकीची लस दिली, ज्याचा दुष्परिणाम संपूर्ण जगावर होत आहे.






## पुणे फेस्टिव्हलचे ८ सप्टेंबर पासून बालगंधर्व रंगमंदिरात

पुणे - ३६व्या पुणे फेस्टिव्हलचे बालगंधर्व रंगमंदिर येथे दि. ८ सप्टेंबर पासून विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होत आहेत. यामध्ये केरळ महोत्सव, उगवते तारे व इंद्रधनू, भारत रंग रंगीला, मराठी कविसंमेलन, गाणी बाबूजी-गदिमांची, लावणी, मिसेस पुणे फेस्टिव्हल स्पर्धा, महिलांची नृत्य स्पर्धा, अभिनेत्री पद्मविभूषण वैजयंतीमाला यांच्यावर चित्रित हिंदी चित्रपट गीते व नृत्य, लिजंट्स ऑफ बॉलीवूड, व्हॉइस ऑफ पुणे फेस्टिव्हल व करंडक, रॉकिंग ९०ी, उत्सव (भारती विद्यापीठ), रोटरीचे इंद्रधनु, शाळांचे समूह नृत्य असे विविध १५ सांस्कृतिक कार्यक्रम दि. ८ ते १६ सप्टेंबर या कालावधीत बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न होतील. याबरोबर गोल्फ, बॉक्सिंग, मल्लखांब व डर्ट ट्रॅक या क्रीडा स्पर्धा देखील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आल्या आहे..

# अब्दुल सत्तार यांनी केली बांधावर जावून पाहणी

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.५ सप्टेंबर

सोयगाव तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून सतत पाऊस पडत असून,अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी प्रशासनाकडून परिस्थितीचा आढावा घेत बुधवारी शेतकऱ्यांच्या बांधावर जावून पाहणी केली तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना धीर दिला.राज्य सरकार नुकसानग्रस्तांच्या पाठिशी खंबीरपणे उभे असून बाधित शेतकऱ्यांनी धीर धरावा असे ना.अब्दुल सत्तार म्हणाले.

दरम्यान सोयगाव तालुक्यातील फर्दापूर,ठाणा,वरखेडी , सोयगाव तसेच सावरखेडा,दत्तवाडी इत्यादी गाव शिवारात बाधित क्षेत्राची पाहणी करून ना.अब्दुल सत्तार यांनी तहसील कार्यालयात प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत आढावा बैठक घेतली.सोयगाव तालुक्यात



झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश ना. अब्दुल सत्तार यांनी शासकीय यंत्रणेला दिले.पंचनामा करीत असतांना एकही बाधित शेतकरी पंचनामा पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी असे ना. अब्दुल सत्तार म्हणाले.

अस्मानी संकटाचा मुकाबला करताना सर्वांना एकजुटीने काम करावे लागणार आहे.यामध्ये सर्व विभागाच्या योग्य समन्वयातून तातडीने मार्ग काढण्यात येईल. पशुधन आणि शेती तसेच पिकांचे प्रचंड नुकसान झाले असल्यामुळे शेतकऱ्यांच्या भावना तीव्र आहेत. त्यामुळे एकही बाधित व्यक्ती पंचनामा पासून वंचित राहणार नाही याची अधिकाऱ्यांनी खबरदारी घ्यावी, येणाऱ्या कालावधीत अतिवृष्टी बाधित भागांचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर वस्तुनिष्ठ आकडेवारी समोर येईल. शासनास नुकसानीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार याबाबत निश्चितपणे नुकसानग्रस्ताच्या हिताचा निर्णय घेतील असे ना. अब्दुल सत्तार म्हणाले.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, तहसीलदार मनीषा मेने,नायब तहसीलदार सतीश भदाणे, कृषी अधिकारी मदन सिसोदिया,गटविकास अधिकारी दादाराव आहिरे,सहाय्यक गटविकास अधिकारी तात्याराव माळी,जलसंधारण विभागाचे सूर्यकांत निकम,मुख्यमंत्री सडक योजनेचे उमेश लिंभारे,जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे राजेश राजगुरू,दीपक मोगडे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे सुभाष सोनवणे,माजी सभापती रामदास पालोदकर,धरमसिंग चव्हाण, माजी जि.प.सदस्य गोपीचंद जाधव,सोयगाव नगर परिषदेतील शिवसेना गटनेता अक्षय काळे,शिवसेना शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे,उस्मान पठाण आदिंसह अधिकारी, कर्मचारी व गावकरी उपस्थित होते.

# उत्सवाचे अनुषंगाने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी ग्रामीण पोलीसांची घेतली आढावा बैठक

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : आगामी सार्वजिनक गणेशोत्सव-२०२४ व ईद-ए-मिलाद च्या अनुषंगाने मा. विरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, छ. संभाजीनगर यांनी मा. डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस अधीक्षक, मा.सुनिल कृष्णा लांजेवार, अपर पोलीस अधीक्षक यांची उपस्थितीत जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व प्रभारी व शाखा अधिकारी यांची आढावा बैठक आज दि ४/९/२०२४ रोजी १६:०० वाजता घेण्यात आली. आगामी सण हे उत्साहात नागरिकांना साजरे करण्यात यावे याकरिता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी सर्व अधिकारी यांना सुचना दिल्या कि, प्रामुख्याने श्री मुर्ती ची प्रतिष्ठापणा करण्यापुर्वी गणेश मंडळांनी ऑनलाईन पध्दतीने स्थानिक पोलीस ठाण्याची परवानगी घेणे अत्यावश्यक आहे. तसेच वॉटर प्रुफ मंडपाची व्यवस्था करून मंडप हा वाहतुकीस अडथळा करेल किंवा वाहतुकीची कोंडी निर्माण होईल अशा पध्दतीने रस्त्यावर टाकु नये. श्री मुर्ती ज्याठिकाणी स्थापन होणार आहे ती जागा ही संपुर्ण पणे लाकडी बॅरेकेटींग करून घेणे अत्यावश्यक आहे, जेणे करून श्रीमुर्ती जवळील खाद्यपदार्थ खाण्यासाठी कोणातेही मोकाट जनावरे प्रवेश करून शकणार नाही. ज्यामुळे श्री मुर्तीचे पावित्र्यास धोका निर्माण होणार नाही. ध्वनी प्रदुषणांचे नियंमाचे काटेकोरपणे पालन करणे अत्यावश्यक आहे. याचे



उल्लंघन झाल्यास गणेश मंडळांना कायदेशिर कारवाईस सामोरे जावे लागेल. गणेश मंडळ परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावावा. पारंपारिक वाद्यांचा वापर करणे गरजेचे आहे. तसेच गणेशमंडळात किंवा परिसरात बसुन जुगार खेळणा-याची सुध्दा गय करु नये अशा विरोध्दात जुगार कायद्यान्चये गुन्हे दाखल करण्यात यावे.

तसेच सर्व प्रभारी अधिकारी यांनी विसर्जन मिरवणुक मार्ग हा स्वत: पायी फिरुन बघावा त्यामध्ये अडथळा असल्यास संबधीत विभागाला पत्र व्यवहार करावा. तसेच विसर्जन मिरवणुकी मध्ये डी. जे. व दारु कोठुन येते त्याचा तपास करण्यात यावा. मिरवणूक मार्गा मध्ये ड्रोन द्वारे पाहणी करून विसर्जनाचे दिवशी ड्रोन कॅमेरा वापरण्यात यावा.

गणेश मुर्तीच्या संरक्षणासाठी गणेश मंडळातील पदाधिकारी यांचे द्वारे २४ तास स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात यावी. ज्याठिकाणी दोन धर्मामध्ये तेढ निर्माण होवुन गुन्हे दाखल आहेत. त्याठिकाणी सायबर पोलीस ठाणे मार्फत तरुणामध्ये जनजागृतीपर व्हिडीओ संदेश प्रसारित करण्यात यावे. अचानक उद्भवणा-या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी दंगा काबु योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी. विसर्जन ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातुन पोहणारे व्यक्ती, लाईफ जॅकेट व इतर साहित्यासह ठेवण्यात यावे. याचप्रमाणे विसर्जनस्थळी गोंधळ होणार नाही याची दक्षता घेवुन तेथे पुरेसा प्रकाशाची व्यवस्था एम.एस.ई.बी. च्या मार्फतीने ठेवण्यात यावी याबाबत प्रभारी अधिकारी यांनी संबधी विभागाशी विसर्जन पावेतो संपर्कात रहावे.यापुर्वी घडलेल्या दोन धर्मातील तणावाचे संदर्भातील गुन्हयातील आरोपीवर प्रभावी प्रतिबंधात्क कारवाई करावी. मुली व महिलांना गणेशउत्सावाचे दरम्यान छेडछाड होणार नाही.




सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सोयगाव; गणेशोत्सव,ईद-ए-मिलाद पार्श्वभूमीवर सोयगाव शहरात पोलीसांचा रूट मार्च;शांततेचे आवाहन



सोयगाव,दि.५ सप्टेंबर : गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीस तैनात झाले आहे त्यासाठी शहरात शांततेचे आवाहन करत बुधवार रोजी (दि.४) ५ वाजता सोयगाव शहरातून छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथील दंगा काबू पथकाद्वारे पोलीसांनी रूट मार्च काढला.यावेळी छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड,अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार,उपविभागीय अधिकारी सिल्लोड डॉ.दिनेशकुमार कोल्हे,यांच्या मार्गदर्शनाखाली सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या नेतृत्वाखाली शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक,बाजार पट्टा,बसस्थानक परिसर आदी भागातून सोयगाव पोलीसांचा रूट मार्च निघाला यावेळी गणेशोत्सव व ईद-ए- मिलाद काळात शहर वासियांनी शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी केले

**गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद साठी सोयगाव शहरासोबत हद्दीतील गावात कडेलोट बंदोबस्त असून २४ तास पोलीस तैनात करण्यात आले आहे. सध्या स्थानिक पोलीस ठाण्याचे कर्मचारी १९, तीन अधिकारी, व गृहरक्षक दल याप्रमाने शहर व हद्दीतील गावात बंदोबस्त तैनात करण्यात येणार असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी सांगितले.**

शहरातील विविध भागातून हा रूट मार्च काढण्यात आला होता यावेळी पोलीसांनी शहरातील गणेश भक्तांना शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले.यावेळी पोलीस उपनिरीक्षक रज्जाक शेख,पोलीस उपनिरीक्षक सतीश बडे,सफौ.दिलीप पवार,राजू बरडे,गजानन दांडगे,अजय कोळी,रवींद्र तायडे, प्रवीण देवरे, सादिक तडवी,शांताराम सपकाळ, आदींसह पोलीस कर्मचारी यांनी शहरातून रूट मार्च काढला होता.

## बिडकीन भगवती विद्यालय शाळेत डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती उत्साहात साजरी



बिडकीन दि ५ सप्टेंबर पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय बिडकीन शाळेत डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीचे औचित्य साधून शाळेत पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते विद्यार्थ्यांना वाचनाची सवय,आवड निर्माण व्हावी विद्यार्थ्यांनी चांगले दर्जेदार पुस्तकांचे वाचन करून वाचन संस्कृती जोपासून आपल्या ज्ञानात भर पडेल यादृष्टीने प्रयत्न करावे व शिक्षण विभाग राबवित असलेली महावाचन चळवळीचा उद्देश सफल करण्यासाठी शाळेत वेळोवेळी महावाचन चळवळ अंतर्गत विद्यार्थी उपक्रम राबविले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीधर ज-हाड यांनी केले .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ राशिनकर यांची उपस्थिती होते.त्यांनी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विषयीं विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रायभान रक्टे , रामनाथ धनवे, सुनिल पवार, विश्रांती सलगरे , आप्पासाहेब किसवे , अशोक डुबे , आशुतोष झारगड, सुभाष राठोड,यांनी परिश्रम घेतले.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग ! आरोपी ताब्यात

कन्नड : शहरातील माळीवाडा परिसरातील अल्पवयीन पीडितेचा विनयभंग झाल्याची घटना दि.०४ रोजी घडली आहे. घरात एकटी असलेल्या अल्पवयीन मुलीची छेड काढत तिचा विनयभंग करण्यात आला. शिवाय तिला व तिच्या पालकास मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून कन्नड शहर पोलीस स्टेशन आरोपी विरोधात पोक्सो व भारतीय न्यायसंहिता कलमानुसार आरोपी तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच आरोपीला तत्काळ ताब्यात गजेण्यात आले आहे. विकास नारायण सवई वय २३ वर्ष रा.कनकावती नगर असे आरोपीचे नाव आहे अधिक तपास पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी करत आहेत.

## अंधांसाठी पहिल्यांदाच ब्रेलमध्ये विमा योजना लाँच

छत्रपती संभाजीनगर- स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कं. लि. (स्टार हेल्थ इन्शुरन्स) या कंपनीने आज या क्षेत्रातील पहिलीच ब्रेल लिपीतील विमा योजना लाँच केल्याचे जाहीर केले. यामुळे नेत्रहीन समाजाला योग्य माहिती मिळवून देत आरोग्य व विम्याशी संबंधित स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.



स्टार हेल्थने वैविध्यपूर्ण आणि आर्थिक सर्वसमावेशकता मोहीम आखत भारतातील ३४ दशलक्ष अंध व्यक्तींना उत्पन्नाच्या संधी देण्याचे ठरवले आहे. कंपनी समाजातील वंचिक, दुर्लक्षित वर्गाला प्रशिक्षण आणि कौशल्य शिक्षण देऊन त्यांना आरोग्य विमा प्रतिनिधी बनवण्यासाठी प्रयत्नशील आहे. याची चांगली बाजू अशी, की यामुळे त्यांना हव्या त्या पद्धतीने, परिचित वातावरणात काम करता येईल आणि आपल्या आयुष्याची सूत्रे हातात घेता येईल.

# आयुष्यात यशस्वी होण्यासाठी सदगुणी व्हावे : डॉ. श्रीरंग देशपांडे

बिडकीन ( प्रतिनिधी) आयुष्यात जर ख-या अर्थाने यशस्वी व्हायचे असेल तर सदगुणी व्हा, त्यासाठी प्रचंड अवांतर वाचन करा, चांगल्या मित्रांची संगत धरा असे प्रतिपादन श्री.सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे यांनी केले.पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळा व विद्यार्थी संसदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



क्रीडा शिक्षक मोहम्मद आसिफ शेख व राहुल शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी रायभान ठाणगे यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुष्का सोनवणे व प्रचिता कळसकर यांनी तर आभारप्रदर्शन उपमुख्याध्यापक युवराज पाडळे यांनी केले. व्यासपीठावर माजी मुख्याध्यापक रावसाहेब जाधव, पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा, राजू शिंदे, बाबासाहेब सोकटकर, ज्ञानेश्वर चाटूपळे यांची उपस्थिती होती.

या पुढे बोलताना डॉ. श्रीरंग देशपांडे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेतील गुणांकडे अधिक लक्ष न देता किंवा गुणवत्ता यादीत समावेशाने अधिक हुरळून न जाता व अपयशाने खचून न जाता सतत चांगल्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करा. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती प्रतिमेचे पूजन डॉ. श्रीरंग देशपांडे, समन्वय समितीचे अध्यक्ष तथा नियामक मंडळाचे सदस्य डॉ.मिलिंद कोनार्डे शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला, मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, नंदकुमार वैद्य डॉ. अंताराम धरपळे, बबनराव ठाणगे किशोर कुलकर्णी उपमुख्याध्यापक युवराज पाडळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशालेच्या संगित शिक्षिका अक्षदा चौथमल व स.भु. गीत मंचाने स्वागत गीत व इशस्तवन सादर केले. प्रमुख पाहुणे डॉ. श्रीरंग देशपांडे व डॉ.

# सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्र उत्सव व ईद ए मिलाद निमित्ताने शांतता समितीची बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. ३ सप्टेंबर : सार्वजनिक गणेशोत्सव उत्सव व ईद ए मिलाद, नवरात्र उत्सव संणाच्या अनुषंगाने आज दि. ३ रोजी सकाळी दहा वाजता बिडकीन येथील मंगल कार्यालयात शांतता समितीची बैठकीचे आयोजन पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांच्या अध्यक्षतेखाली,व बिडकीन पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावातील आगामी येणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव ईद ए मिलाद, नवरात्र उत्सव संणाच्या निमित्त गणेश मंडळ अध्यक्ष व उपाध्यक्ष व सदस्य, पोलीस पाटील,



गावातील तंटामुक्त अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरपंच, प्रतिष्ठित नागरिक, पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली, यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांनी मार्गदर्शन प्रसंगी सांगितले की हिंदू मुस्लिम बांधवांनी सार्वजनिक गणेशोत्सव,नवरात्र उत्सव,ईद ए मिलाद समितीने वरील सन उत्साहात साजरी करावे या काळामध्ये कायदा सुव्यवस्था बिघडू देऊ नये वरील उत्सव आनंदमय वातावरणामध्ये साजरी करावे कोणी कायदा हातात घेऊ नये तसेच शांतता राखावी कोणत्याही समाजाने चुकीचे काम केल्यास त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात येईल, पोलीस प्रशिक्षणाला सहकार्य करावे असे आव्हान सिद्धेश्वर भोरे यांनी केले, तसेच पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील, सरपंच अशोक धर्मे आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले यावेळी, सरपंच संजय गरड,सागर फरताळे, अंकुश धर्मे, रमेश शिंदे, मधुकर सोकटकर, काकासाहेब टेके,किरण गुजर, राहुल ठाणगे,प्रवीण चव्हाण,बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटील, सरपंच, उपसरपंच, तंटामुक्त समिती अध्यक्ष, महिला पोलीस पाटील, सर्व पक्षाचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार बांधव, आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती,

# संविधान जागर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अँड. शाम तांगडे

छत्रपती संभाजीनगर - २९ सप्टेंबर २०२४ रोजी संविधान जागर साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या उत्साहात हे संमेलन संपन्न होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी जेष्ठ विचारवंत अँड. शाम तांगडे यांची निवड करण्यात आली आहे. या साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी प्रा.अंजलीताई आंबेडकर उपस्थित राहणार आहेत, तर समारोपाच्या कार्यक्रमात अँड. बाळासाहेब आंबेडकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असतील. संमेलनाचे मुख्य स्वागत अध्यक्ष, प्रसिद्ध समाजसेवक, धम्मसेवक डॉ.



प्रमोद दुथडे हे असणार आहेत. या महत्त्वपूर्ण संमेलन संत एकनाथ नाट्य मंदिर, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे.

संविधान जागर साहित्य संमेलनाचे आयोजन फुले-आंबेडकर विद्वत सभा संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे. या संमेलनात विविध सामाजिक, सांस्कृतिक, आणि साहित्यिक विषयांवर चर्चा होणार असून, संविधान आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. समाजातील विविध विचारवंत, लेखक, आणि सामाजिक कार्यकर्ते या संमेलनात सहभाग घेणार आहेत. हे संमेलन यशस्वी करण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी विशेष सहकार्य करण्याचे आवाहन फुले-आंबेडकर विद्वत सभेचे पदधिकारी प्रा. डॉ. प्रज्ञा साळवे, प्रा. भारत सिरसाट, डॉ. संजय मुन, रतनकुमार साळवे,संयोजन समितीचे के. ई. हरदास,धनराज गोंडाने, डॉ. यशवंत खडसे, सविता अभ्यंकर, अशोक जोहरे, प्रा. संजय साळवे, प्रा. मोहन सौन्दर्य, डॉ सुधाकर दिवेकर, डॉ. मिलिंदराज बुक्तरे, दादाराव त्रिभुवन, सुनील पुंडकर, शैलेंद्र मिसाळ, एस. के. बावस्कर, अँड. संघपाल भारसाखळे, दैवशीला गवांदे, शारदा पगारे, प्रा.संगीता अंभोरे, समाधान सुरडकर, गंगा सुरडकर, अँड शारदा गायकवाड, डॉ. संजय खरात,भीमराव गाडेकर, गौतम वाघ, साहेबराव सिरसाट, अमरदीप वानखडे,अँड. विजय वानखेडे,आदीसह समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये कोलेंजिओस्कोपीची सुविधा

## पित्ताशयाचे खडे काढण्याचे आधुनिक तंत्रज्ञान, ओपन सर्जरीला पर्याय, बीनटाक्याची शस्त्रक्रीया

छत्रपती संभाजीनगर - पित्ताशयाचे खडे काढण्यासाठी खुल्या शत्रक्रीयेतील जोखीम टाळून खडे काढणे मेडीकव्हर हॉस्पिटलमध्ये शक्य झाले आहे. दुर्बीनीद्वारे पित्ताशयाचे खडे काढण्याचे कोलेंजिओस्कोपीची हे अद्ययावत तंत्रज्ञान मेडीकव्हर हॉस्पिटलमध्ये उपलब्ध करण्यात आले असून नुकत्याच ११ रूग्णांवर यशस्वी शस्त्रक्रीया पार पडल्या आहेत. या प्रकारच्या प्रोसिजरद्वारे अडिच ते साडेतीन सेंटिमिटरचे पित्ताशयाचे खडे फोडून काढता येणे शक्य झाले आहे. अशी माहीती पोटविकारतज्ज्ञ डॉ. चेतन राठी यांनी दिली.

पोटविकार तज्ज्ञ डॉ. चेतन राठी म्हणाले की, पुर्वी मुंबई, पुणे, नागपुर या शहरातच कोलेंजिओस्कोपीची सुविधा होती. आता मराठवाड्यात पहिल्यांदाच मेडीकव्हर हॉस्पिटलमध्ये ही सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे खुल्या टाक्याच्या शस्त्रक्रीयेशिवाय दुर्बीनीद्वारे पित्ताशयाचे खडे काढता येणे शक्य झाले आहे. त्यामुळे जोखीम कमी होऊन रुग्णालयातील मुक्कामही कमी झाला आहे.



एका ७५ वर्षीय महिलेला पित्ताशयाच्या नलिकेत स्टेंट टाकण्यात आला होता. तो स्टेंट काढण्यात न आल्याने त्याचे तुकडे पित्ताशयाच्या नलिकेतच झाले. त्यामुळे महिलेला कावीळ, पोटात इन्फेक्शन होऊन पोटात असह्य वेदना होत होत्या. खुली शस्त्रक्रीया करणे महिलेच्या वयोमानाने शक्य नव्हते. त्यांनी मेडीकव्हर हॉस्पिटल गाठले. इथे कोलेंजिओस्कोपी द्वारे महिलेच्या पोटातून स्टेंटचे तुकडे काढण्यात यश मिळाल्याने महिलेला त्रासातून मुक्ती मिळाली. या आणि अशा प्रकारच्या ११ शस्त्रक्रीया आतापर्यंत यशस्वीपणे पार पडल्या आहेत.

कोलेंजिओस्कोपीद्वारे पित्ताशयाच्या नळीच्या कर्करोगाचे निदान करण्यासाठी सॅम्पलही घेता येणे शक्य झाले. पुर्वी यासाठी ओपन सर्जरी करून सॅम्पल घ्यावे लागत होते. अथवा शस्त्रक्रीया करूनच तपासणी करावी लागत होती. पित्ताशयातील रक्तस्त्राव शोधणेही या तंत्रज्ञानामुळे शक्य झाले आहे. पित्ताशयाच्या ६ मिलीमिटरच्या नळीद्वारे ३ मिलीमिटरची दुर्बीन टाकून ही प्रोसिजर करण्यात येते.

लठ्ठपणा, रक्ताचे आजार, कोलेस्ट्रालचा अतिस्त्राव, वाढलेली चरबी या कारणांनी पित्ताशयात खडे तयार होतात. १०० पोटविकाराच्या रुग्णांत ५ टक्के रूग्णांत पित्तायशात खडे आढळतात. त्यापैकी १० टक्के रुग्णांना ते खडे काढावे लागतात. सर्वांनाच खडे काढण्याची गरज पडत नाही. यात महिलांचे प्रमाण पुरूषांपेक्षा अधिक असते. वयाच्या तिशीनंतर हा आजार संभवतो. पित्ताशयाशी निगडीत आजार वाढत आहे. त्यासाठी आजची बदलेली जिवनशैली, तेलकट, तुपकट, मसालेदार पदार्थांचे अतिसेवन, हार्मोनल बदल कारणीभूत असल्याचे डॉ. राठी म्हणाले.

# वाळूज महानगरात शिक्षक दिन उत्साहात साजरा







तभा प्रतिनिधी, दि. ४

वाळूज महानगर: येथील विविध शाळा शहरातील शाळांमध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारून इतर विद्यार्थ्यांना अध्यापन केले, तर पालक शिक्षक संघाच्यावतीने शाळेतील शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषद साजापूर

येथे आयोजित कार्यक्रमांमध्ये मुख्याध्यापक धनंजय नागमवाड यांच्या हस्ते सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. त्यावेळी महाराष्ट्र युवक काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष विधी विभाग सचिन जाधव यांनी शाळेतील शिक्षकांचा सत्कार केला. कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे केली. यावेळी मुख्याध्यापक धनंजय नागमवाड, अनिल जाधव, देविदास काळे, सुनीता गवई, ज्योती ढोमणे, मनीषा ढवळे, प्रिती गंगवाल,सोनाली रेशवाल, अश्विनी मोरे, रेणुका शिंदे, दिपाली दांडगे यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषद वडगाव को.

येथे आयोजित कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे केली यावेळी मुख्याध्यापक व शिक्षक यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित्त शिक्षक बनून प्रत्यक्ष अध्यापनाची अनुभूती घेतली, कार्यक्रम करण्यासाठी मुख्याध्यापक सुनील चीपाटे, हरिश्चंद्र रामटेके व सर्व शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यशश्री विद्यालय वडगाव

येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप वाघ उपस्थित होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थी मुख्याध्यापिका कु.चैताली नेमाडे व इतर शिक्षक वर्ग उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित्त शिक्षक बनून प्रत्यक्ष अध्यापनाची अनुभूती घेतली, व दैनंदिन जीवनात शिक्षकांना व विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्यांना कसे सामोरे जावे लागते, ते आपल्या मनोगता मधून व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी नंदिनी देशमुख व पल्लवी ढगे यांनी केले नंतर आभार पल्लवी जाधव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उमेश हराळ, गोकुळ बिघोत, दिपक जंजाळ,मारोती बिरादार,अर्जुन गरड, मिराबाई जाधव, दिपिका मस्के, अनुजा वैद्य,चिलके आदींनी परिश्रम घेतले.


## विश्वजीत भावे यांनी पटकावला रेनाटस वेलनेस कंपनीच्या एक्झीकेटीव्ह डायरेक्टर पदाचा मान

छत्रपती संभाजीनगर - छत्रपती संभाजीनगर मधे गेल्या ६६ वर्षांपासून भावे आणि कंपनी नावाजलेली दुग्धजन्य व खाद्य पदार्थ विक्री व्यवसायातील कंपनी ग्राहकांच्या मनामनात पोहोचलेली आहे. अशा भावे आणि कंपनीचे संचालक असणारे श्री विश्वजीत भावे यांनी आपला वडिलोपार्जित व्यवसाय सांभाळत रेनोटेस वेलनेसया नॅनो आयुर्वेदिक क्षेत्रातील कार्यरत असलेल्या कंपनीच्या सोबत काम करण्यास सुरुवात केली.



विश्वजीत भावे यांनी अत्यंत सचोटीने.. निष्टेनी रेनाटस नोव्हा या कंपनीचे काम सुरू केले. रेनाटस नोव्हा या कंपनीच्या माध्यमातून विश्वजीत भावे यांनी गेल्या दीड वर्षातच तीनशेहून अधिक फिल्डवर काम करणाऱ्या डिस्ट्रिब्युटर्स ची मोठी मजबूत फळी निर्माण केली. कामाच्या कार्यपध्दतीमुळे विश्वजीत भावे यांनी रेनाटस नोव्हा कंपनीच्या एक्झीकेटीव्ह डायरेक्टर पदाचा मान पटकवला आहे.. भावे यांच्या पदोन्नतीसाठी त्यांच्या सर्व मित्रांनी, नातेवाईक आणि डिस्ट्रिब्युटर्सनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे आणि विश्वजीत भावेयांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## वाळूज महानगर गणेश महासंघाची कार्यकारिणी जाहीर



वाळूज महानगर : येथील गणेश महासंघाची बैठक महात्मा फुले स्मारक येथे संस्थापक अध्यक्ष रामचंद्र कसुरे यांच्या अध्यक्षेखाली नुकतीच पार पडली. बैठकीमध्ये सर्वानुमते अध्यक्षपदी ज्ञानेश्वर गायकवाड यांची निवड करण्यात आली. तर, कार्याध्यक्षपदी प्रल्हाद गुलभिळे यांची निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणीमध्ये सचिव बाळासाहेब गाडे, सहसचिव अमोल सोमवंशी, शिवाजी हिवाळे, उपाध्यक्ष स्वप्निल अडसुळे, योगेश साळे, सागर शिंदे, दत्तात्रय वरपे, सहकार्याध्यक्ष ज्ञानेश्वर म्हस्के तर, प्रसिद्धिप्रमुख जितेंद्र पाटील यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी सरपंच सुनील काळे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ३७२/२०२४

अर्जदार : १) अनुसयाबाई पंढरीनाथ मांडवगड, वय ८० वर्षे, धंदा निरंक, रा. धामोरी खु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) रतन पंढरीनाथ मांडवगड, वय ६३ वर्षे, धंदा शेती रा. धामोरी खु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) शिवाजी पंढरीनाथ मांडवगड वय ६० वर्षे, धंदा शेती रा. धामोरी खु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सुनंदा भ्र. भिकन नागुर्डे वय ५२ वर्षे, धंदा घरकाम रा. आंबेडकर नगर, नेवासा रोड, श्रीरामपुर ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. जी.बी. चव्हाण यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ ते ४ हे नात्याने सख्खे वहिण भाऊ असुन अर्जदार क्र.१ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे पंढरीनाथ बारकु मांडवगड हे मौजे धामोरी खु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०४/११/२०११ रोजी मौजे धामोरी खु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत पंढरीनाथ बारकु मांडवगड यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन मयताचे पश्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्तीनंतरचा आक्षेप - उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक ११ /१०/२०२४ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ५/९/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ३६५/२०२४ प्रकरणात पुढील तरीख दि. ८/१०/२०२४

अर्जदार : १) शशिकला क्ष. बापु बरडे, वय ६० वर्ष, धंदा घरकाम, २) दत्तु पि. बापु बरडे, वय ५० वर्ष, धंदा मजुरी, ३) संतोष पि. बापुराव बरडे, वय ४४ वर्ष, धंदा मजुरी, ४) रामनाथ पि. बापुराव बरडे, वय ४१ वर्ष, धंदा मजुरी, ५) ताराबाई भ्र. भानुदास बरडे, वय ४१ वर्ष, धंदा घरकाम, ६) कावेरी पि. भानुदास बरडे, वय १९ वर्ष, धंदा घरकाम, ७) सरीता पि. भानुदास बरडे, वय १७ वर्ष, अ.पा.क. आई अर्जदार क ५ ताराबाई भ्र. भानुदास बरडे, वय ४१ वर्ष, धंदा घरकाम, ८) पवन पि. भानुदास बरडे, वय १६ वर्ष, अ.पा.क. आई अर्जदार क ५ ताराबाई भ्र. भानुदास बरडे, वय ४१ वर्ष, धंदा घरकाम, सर्व रा. येसगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एम. पी. दारूंटे गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ ते ४ यांची आई असुन अर्जदार क २ ते ४ हे आपसात नात्याने सख्खे भाउ आहे. अर्जदार क ५ हि अर्जदार क १ चा मुलगा व अर्जदार क २ ते ४ यांचा मयत भाउ नामे भानुदास बापुराव बरडे याची पत्नी असुन अर्जदार क ६ ते ८ हे मयत भानुदास बापुराव बरडे यांची मुली व मुलगा आहे. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ ते ४ यांचे वडील व अर्जदार क ५ चे सासरे आणि अर्जदार क ६ ते ८ यांचे आजोबा नामे बापु मारोती बरडे हे दि. ३१/०१/२०२२ रोजी मौजे येसगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयत बापु मारोती बरडे व अर्जदार क १ चा मुलगा, अर्जदार क २ २ ते ४ यांचा भाउ व अर्जदार क ५ चे पति व अर्जदार क ६ ते ८ यांचे वडील नामे भानुदास बापुराव बरडे हे दि. २६/०९/२०१३ रोजी मौजे येसगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयत बापु मारोती बरडे व मयत भानुदास बापुराव बरडे यांना अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत मयत बापु मारोती बरडे यांना अर्जदार क १ ते ८ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत बापु मारोती बरडे यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता

जाहीर प्रगटन. आज दि. ०५/०९/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## गंभीरता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सरसकट मदत करा –आ.लोणीकर



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर- मंठा- नेर- सेवली विधानसभा मतदारसंघासह जालना जिल्ह्यात व मराठवाड्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टी किंवा ढगफुटी झाली आहे. तर काही ठिकाणी सततचा पाऊस मागील महिनाभरापासून सुरू आहे. अशा परिस्थितीत सततच्या पावसामुळे महिनाभरात ऊन पडलेलेच नाही, परिणामी शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठे नुकसान झालेले आहे.

त्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा कृषी अधीक्षक यांच्यासह बैठक करून तात्काळ परतुर विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्याचा आढावा शासन व पिक विमा कंपनीला पाठवावा व सरसकट मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केली. या वेळी आमदार लोणीकर यांच्या सोबत भाजपा परतूर तालुका अध्यक्ष शत्रूघन कणसे, जालना भाजपा युवा मोर्चा चे जालना जिल्हाध्यक्ष संपतराव टकले, परतूर कृषी उत्पन्न बाजार समिती चे उप सभापती संभाजी वारे, परतूर तहसीलदार प्रतिभा गोरे, परतूर पंचायत समिती चे गट विकास अधिकारी तांगडे, नरेश कांबळे रामदास बिडवे शिवाजी बिडवे बापूराव बिडवे रामदास घोंगडे प्रकाश बिजोले सचिन बिडवे दत्ता वायाळ रामकिसन सावंत रामकिसन वायाळ राजेंद्र वायाळ आण्णासाहेब वायाळ उद्धव वायाळ आप्पा सावंत गणपतराव सोळंके गजानन खवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### शेतकऱ्यांचा जनआक्रोश ट्रॅक्टर मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला

## प्रलंबित रक्कम न मिळाल्यास आणखी तिव्र आंदोलन -गोपाळराव बोराडे

### कल्याणकाका बोराडे शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उतरले रस्त्यावर

**तभा वृत्तसेवा**
**मंठा–परतुर/प्रतिनिधी**

जनकल्याण विकास मंचच्या वतीने सन २०२३ - २४ च्या खरीप सोयाबीन, कापूस इत्यादी पिकांचा ७५ टक्के प्रलंबित विमा शेतकऱ्यांना तात्काळ द्यावा या मागणीसाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर जनआक्रोश ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. गुरुवार ता.५ रोजी बाजार समितीचे उपसभापती गोपाळराव बोराडे, जनकल्याण विकास मंचचे संस्थापक कल्याणराव बोराडे यांच्या नेतृत्वाखाली मंठा, परतूर, नेर - सेवली विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना २०२३ - २४ च्या पिकांचा ७५ टक्के प्रलंबित विमा तात्काळ द्यावा यासह सोयाबीन प्रति क्विंटल ६००० भाव देण्यात यावा, कापूस बारा हजार पर्यंत भाव देण्यात यावा, चालू वर्षी अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, पांगरी खुर्द या गावाचे पुनर्वसन करण्यात यावे, समृद्धी महामार्ग जालना ते नांदेडच्या प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना मुंबई ते नागपूरच्या समृद्धी महामार्ग दराप्रमाणे भाव देण्यात यावा, वन्य प्राण्यांच्या त्रासापासून शेती संरक्षण मिळावे आदि मागण्या मान्य करण्यासाठी हजारो शेतकऱ्यांचा जनआक्रोश ट्रॅक्टर मोर्चा मंठापासून परतुर तसेच साईबाबा मंदिरापासून उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत काढून उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी बोलताना बाजार समितीचे उपसभापती गोपाळराव बोराडे म्हणाले की, सन २०२३ - २४ या आर्थिक वर्षांमध्ये शेतकऱ्यांनी पिक विमा विमा कंपनीकडे भरला होता मात्र, खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांच्या





शेतीमालाचे नुकसान झाल्यानंतर कंपनीकडे तक्रारी करण्यात आल्या, त्यानुसार कंपनीच्या प्रतिनिधीने प्रत्यक्ष शेतात कापूस, सोयाबीन व इतर पिकांच्या नुकसानीची पाहणी केली होती. त्याला प्रतिसाद म्हणून कंपनीने मंजूर विम्यातील २५% अग्रीम रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर अदा करण्यात आली मात्र, उर्वरित बाकी ७५ टक्के रक्कम कंपनीकडे बाकी असून ती मिळावी म्हणून वेळोवेळी कंपनीकडे मागणी करण्यात येत असली तरी कंपनी कोणताही प्रतिसाद देण्यास तयार नाही. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती खूपच खालवली असल्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना न्याय द्यावा अन्यथा २३ सप्टेंबर पासून शेतकरी तीव्र आंदोलन करतील असा इशारा गोपाळराव बोराडे यांनी दिला. या मोर्चानंतर गोपाळराव बोराडे यांच्यासह कल्याणराव बोराडे, प्रभूसिंग चव्हाण, प्रकाशराव सरकटे, जनार्धन राऊत, गजानन खरात, विष्णू सोनवणे, भागवत मुर्तुडकर,गणेशराव बोराडे, युवा नेते सचिन गोपाळराव बोराडे, शिवाजीराव भोसले, शिव–ाजीराव सोळंके, शिवाजीराव साकळे, प्रतापराव तोर, मदनराव खुळे, कल्याणराव देशमुख, सोनाजीराव बोराडे, युवराज वायाळ, अंकुशराव वायाळ, बळीराम राठोड, बाळू वायाळ, चैतन्य कोल्हे, शिवेंद्र पाटणकर, राजेभाऊ वायाळ, अशोकराव काकडे, विजय देशमुख यांच्यासह हजारो शेतकरी ट्रॅक्टरसह सहभागी झाले होते.

## संक्षिप्त

### महावाचन उत्सव ग्रंथ प्रदर्शन कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालय व लोकमान्य सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने ता. ५ गुरवार रोजी येथील गटशिक्षण अधिकारी कार्यालयात महावाचन उत्सव तसेच ग्रंथ प्रदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .या कार्यक्रम ला म्हणून उद्घाटन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन सुरडकर व गटशिक्षणाधिकारी दिलीप शहागडकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी झालेले कार्यक्रमाला शिक्षण विस्तार अधिकारी बी.एल.बडगे , शेखर देशमुख , घायाळ सर , रामेश्वर शर्मा ,भगवान देठे , शिंगणे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते .या ग्रंथ प्रदर्शनास जि प प्रा शा नंदुबाई नगर नवे भोकरदन , जि प प्रा शा जय भवानीनगर नवे भोकरदन , तसेच कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी भेट दिली . विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी हा एक स्तुत उपक्रम घेण्यात आला आहे .

### राष्ट्रवादी काँग्रेस असंघटित कामगार आघाडीच्या वतीने नियुक्त्या जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी असंघटित कामगार आघाडीच्या वतीने आज जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते नियुक्ती देण्यात आल्या. असंघटित कामगार आघाडीच्या जिल्हा सरचिटणीसपदी श्री.अशोक जाधव, जिल्हा उपाध्यक्षपदी वाहेद तांबोळी तसेच जालना जिल्हा शहराध्यक्षपदी रवी भुजंग यांची नियुक्ती करण्यात आली. सदर नियुक्त्या या असंघटित कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल वानखेडे यांचे नेतृत्वाखाली देण्यात आल्या आहेत. यावेळी मराठवाडा कामगार आघाडीचे कार्याध्यक्ष श्री.सतीश वाहुळे,शहर कार्याध्यक्ष मिर्झा अन्वर बेग ,सामाजिक सेलचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे,महिला शहर जिल्हा उपाध्यक्ष संगीता झाडीवाले, सामाजिक सेलचे कार्याध्यक्ष अमोल खरात, सचिन ईरछे, आनंद मस्के व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बालकांमध्ये सकारात्मकआणि योग्य बदल घडविणारा अभियंता म्हणजे शिक्षक –मा.सरपंच अविनाश राठोड



**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील जि.प.उ. प्राथमिक.शाळा नायगाव येथे राष्ट्रपती भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्यी जयंती आणि शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात गावातील गरीब घराण्यातील अजय आसाराम चव्हाण यांचे चिरंजीव जिगर चव्हाण यांनी साकारली मुख्याध्यापकाची भूमिका ., त्यांच्या हस्ते डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पुष्पहार,पुजन आणि श्रीफळ फोडून करण्यात आले. प्रस्ताविकामध्ये मुख्याध्यापक सुभाष जायभाये यांनी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या इतिहासाचा लेखाजोखा विद्यार्थ्यांना सांगितला. सर्वपल्ली राधाकृष्णन आशा महान विभूतींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या जीवनामध्ये योग्य बदल घडवून सकारात्मक जिवन जगायला हवे असे त्यांनी याप्रसंगी सांगितले. या जयंती आणि शिक्षकदिना निमित्त प्रमुख पाहुणे मा.सरपंच अविनाश राठोड यांनी सर्वप्रथम डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला नतमस्तक,अभिवादन करून केले आणि शिक्षक दिनाच्या सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. पुढे बोलताना त्यांनी बालकांमध्ये सकारात्मक आणि योग्य बदल घडविण्याचे अभियंता म्हणजे शिक्षक होय. विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक बदलासाठी योगा,व्यायाम, मानसिक बदलण्यासाठी शिक्षण आणि तंत्रज्ञानामध्ये कम्प्युटरचा जास्तीत जास्त करायला हवा. या जयंती निमित्त अनिल राठोड, श्रीहरी मगर, विजय दाहीजे, विजय राठोड इतरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक सुभाष जायभाये,समाधान काळे, विठ्ठल दुबळकर ,मनीषा अवसरमोल आणि विजया चव्हाण ई. उपस्थिती होती. या दिवशी जि.प.उच्च प्राथ. शाळेतील विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षिका बनवून शाळेचा दिवसभरांचा योग्यरीत्या साभाळ केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सुभाष जायभाये तर आभार प्रदर्शन समाधान काळे या शिक्षकांनी केले. विद्यार्थी ,शिक्षक,शिक्षिका आणि गावकऱ्यांच्या मदतीने हा कार्यक्रम सफल आणि पूर्ण झाला.

## भारतीय तत्त्वज्ञानाचे जनक डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन– प्रोफेसर डॉ.विजय पाटील

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

दिनांक ५ सप्टेंबर २०२४ येथील सिल्लोड शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित, सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ५ सप्टेंबर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रोफेसर डॉ. विजय पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. उपप्राचार्य डॉ. प्रोफेसर सुनील मेढे व उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थी प्रणव विठोरे, अंबिका अक्कर, आदित्य साळवे, मिलिंद दांडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर प्रमुख वक्ते म्हणून प्रोफेसर डॉ. विजय पाटील यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात एक शिक्षक म्हणून केली व पुढे भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण जगभर केला म्हणून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना लोकमान्य टिळक यांनी भारतीय तत्त्वज्ञानाचे जनक म्हणून संबोधले. पहिल्या महायुद्धानंतर



राष्ट्रसंघाचे सदस्य म्हणून तर दुसऱ्या महायुद्धानंतर युनेस्को चे सदस्य म्हणून जगभर शांतता पसरविण्याचे काम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी केले. तेव्हापासून ५ सप्टेंबर हा दिन डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी केली जाते असे प्रतिपादन प्रोफेसर. डॉ. विजय पाटील यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. रमेश देशमुख यांनी शिक्षकांना समाजाच्या भावना जपता आल्या पाहिजे विद्यार्थ्यांना ज्ञानदानाबरोबर चारित्र्य, शीलता जोपासता आली पाहिजे. याचीही शिकवण शिक्षकांनी दिली पाहिजे तसेच नव्याचा शोध घेऊन ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य शिक्षकांनी केले पाहिजे. असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दिपाली जाधव या विद्यार्थिनीने केले तर आभार प्रदर्शन कु. प्राची हिवाळे या विद्यार्थिनीने केले राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मुसळधार पावसाने होणाऱ्या आकस्मिक मर टाळण्यासाठी पिकांचे व्यवस्थापन करा

### अंबडचे तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड ५ सप्टेंबर अतिवृष्टी तसेच मुसळधार पावसाने शेतात जास्त प्रमाणात पाणी साचते. म्हणून या अतिरिक्त पाण्याचा लवकरात लवकर निचरा करवा. आणी शेतात वापसा येताच कोळपणी व खुरपणी करावी असे आवाहन तालूका कृषी अधिकारी सचिन गिरी यांनी काढलेल्या प्रसिद्धी पत्रकांत म्हंटले आहे.

अतिवृष्टी तसेच मुसळधार पावसाने शेतात पाणी जमा झाल्यानंतर शेतामध्ये झाडे सुकू लागलेली दिसताच, लवकरात लवकर म्हणजे २४ ते ४८ तासाच्या आत शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या वतीने सुचविलेल्या उपाययोजना कराव्यात. जेणेकरून पुढील होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल.

शेकऱ्यांनी लवकरात लवकर २०० ग्रॅम युरिया + १०० ग्रॅम पांढरा पोटॅश (००:००:५० खत ) + २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १०



लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे आळवणी करावी. किंवा १ किलो १३:००:४५ + २ ग्रॅम कोबाल्ट क्लोराईड + २५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड २०० लिटर पाण्यातून मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली आळवणी करावी. तसेच वरील प्रमाणे द्रा–वणाची आळवणी केल्यानंतर सुकू लागलेल्या झाडाजवळची माती पायाने लवकरात लवकर दाबून घ्यावी. या उपाययोजना कराव्यात म्हणजे शेतातील मर रोग उद्भवण्याआधीच तो ताबडतोब नष्ट होण्यास मदत होईल. असे कृषी विभागाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### भगवान सर्वज्ञ श्री.चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनी राज्यशासनाच्या वतीने

## श्रीक्षेत्र जाळीचा देव येथे विविध विकास कामांसाठी २४ कोटी रुपयांचा निधी मंजुर –आ.संतोष पाटील दानवे

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भगवान सर्वज्ञ श्री.चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनी राज्यशासनाच्या वतीने अनोखे नमन करण्यात आले असुन भोकरदन तालुक्याती क्षेत्र जाळीचा देव येथील विविध विकास कामांसाठी ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत २४ कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. तालुक्यातील श्रीक्षेत्र जाळीचा देव येथे विविध विकास कामे करण्यासाठी स्थानिक नागरीकांसह महानुभाव पंथीय भक्तांची अनेक दिवसांची मागणी होती. सदर मागणीच्या अनुषंगाने माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली देवस्थान व परिसराची सखोल पाहणी जिल्हाधिकारी जालना, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.जालना, कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग, जालना व जिल्हा नियोजन अधिकारी, जालना, उपविभागीय अभियंता, भोकरदन व माझ्या प्रमुख उपस्थितीमध्ये करुन बृहत आराखडा शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता.



सदर बृहत आराखडयाच्या अनुषंगाने आमदार संतोष पाटील दानवे यांनी राज्यशासनाकडे सतत पाठपुरवा केला असुन आज राज्यसरकारच्या वतनी ऑनलाईन पध्दीतीने जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे आलेल्या शिखर समितीच्या बैठकीमध्ये श्रीक्षेत्र जाळीचा देव येथील बृहत आराखडयास मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे, उपमुखमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार यांनी देवस्थान व परिसरातील विविध विकास कामांसाठी २४ कोटी रुपयांचा निधीस मान्यता दिली आहे. यामध्ये प्रामुख्याने सर्व सोईसुविधायुक्त भक्तनिवास, प्रसादालय, शॉपिंग कॉम्प्लेक्स, लहान मुलांसाठी व वयोवृध्द भक्तांसाठी गार्डन, संरक्षणभिंत, अत्याधुनिक व्हयु पॉईट, गाव अंतर्गत सिमेंट कॉक्रिटीकरण, सुशोभिकरण, सौर ऊर्जावर चालणारे पंप, वॉटर हार्वेस्टिंग, शौचालय, विद्युतीकरणासाठी पथदिवे इत्यादी अनुषंगीक कामांचा समावेश आहे. श्रीक्षेत्र जाळीचा देव येथे महाराष्ट्रसह देशभरातील महानुभाव पंथीय भक्त व पर्यटकांची वर्षभर वर्दळ असते त्यामुळे या कामांच्या माध्यमातुन श्रीक्षेत्र जाळीचा देव संस्थानच्या विकासासह पर्यटनाला चालना मिळणार आहे. मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे, उपमुखमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार यांनी ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत २४ कोटी रुपयांचा निधी मंजुर केल्याबद्दल स्थानिक ना–गरीकासह भक्तामध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## महिला कार्यकर्त्यांचा माजी आ.चव्हाण यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील सरस्वती कॉलनी मधील महिला कार्यकर्त्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या शकुंतला कदम, जिल्हा शहराध्यक्षा रिंकल तायड,महिला जिल्हा उपाध्यक्षा संगिता झाडीवाले, सिध्देश्वर शिंदे, संतोष घडे, परमेश्वर कापसे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी वर्षा झाडीवाले, सावित्री तिरूखे,सविता जगधने,आशाबाई जगधने, ज्योती गायकवाड, राहुल डाखुरकर, विक्की साळवे यांनी राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी त्यांचे स्वागत केले.

## पतसंस्थांना कर्ज वसुलीसाठी मुख्यालयातून पोलीस बंदोबस्त देण्यासाठी प्रयत्न –नोपानी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील पतसंस्थांना कर्ज वसुलीसाठी थेट पोलीस मुख्यालयातून सशुल्क पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी आज गुरुवार दि. ५ ऑगस्ट रोजी जालना जिल्हा नागरी व कर्मचारी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या शिष्टमंडळाला दिली.

जालना जिल्हा नागरी व कर्मचारी सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे प्रसन्ना जाफराबादकर, महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बद्रीनारायण आसावा, विशेष वसुली अधिकारी श्री. चिनके, आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे ज्ञानेश्वर काळे, स्वागत नागरिक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ड. दशरथ इंगळे यांचा समावेश



असलेल्या शिष्टमंडळाने श्री. नोपानी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की, आमची फेडरेशन जालना जिल्ह्यातील सर्व पतसंस्थाची शिखर संस्था आहे. या सहकारी संस्थेच्या सभासद पतसंस्थाकडील थकीत कर्ज वसुलीकरीता पोलीस बंदोबस्त आवश्यक असतो. कारण सर्व पतसंस्था ह्या त्यांच्याकडील थकीत कर्जाच्या वसुलीकरीता लवाद कोर्ट तथा सहकार न्यायालय यांच्या कार्यालायाकडून वसुली प्रमाणपत्र तथा आदेश प्राप्त करून घेतात. सदर आद–ेशाची अमलबजावणी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये जिल्हा उपनिबंधक यांच्या आदेशान्वये केली जाते. सदरचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ व कलम १०१ अन्वयचे वसुली प्रमाणपत्र हे शासनाकडून दोन महिन्यात दिले जाते. शासनही वसुलीची बाब गांभीर्याने घेते. कारण पतसंस्था जो पैसा कर्ज रूपाने कर्जदारांना देतात तो सर्वसामान्य ठेवीदार सभासदांचा असतो. त्यामुळे ठेवीदारांनी पैश्याची मागणी केल्यावर ठेवीदारांना त्यांच्या' ठेवींची रक्क्म परत देण्याकरिता कर्जदारांकडील कर्जवसुली होणे गरजेचे आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी विशेष वसुली अधिकारी हे त्यांना असलेल्या कायदेशीर अधिकारनुसार करण्यासाठी कर्जदार व जामीनदार यांच्या घरी स्थावर तथा जंगम जप्तीकरीता जाणे आवश्यक असते. त्यावेळी सदर कर्जदार, जामीनदार, त्यांचे नातेवाईक किंवा हितसंबंधिताकडून अडथळा तथा विरोध होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यावेळी संबंधित ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा तथा सार्वजनिक शांततेचा भंग होऊ शकतो. जप्तीसाठी सशुल्क पोलीस बंदोबस्त मिळण्याबाबत पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे अर्ज केल्यानंतर संबंधित कार्यक्षेत्रामधील पो–लीस स्टेशनला पत्र पाठवुन अहवाल देण्याबाबत कळविण्यात येते. परंतु कर्जदार एका, एक जामीनदार दुसऱ्या तर दुसरा जामीनदार तिसऱ्याच याप्रमाणे वे–गवेगळ्या पोलीस स्टेशन हद्दीमध्ये वास्तव्यास असतो. त्यामुळे अहवाल आपल्या कार्यालयास येण्यास एवढा विलंब होतो की या सर्व कार्यवाहीमध्ये दिड ते दोन महिन्याचा अवधी निघून जातो. त्यामुळे कर्जदारांना नोटीसद्वारे कळविण्यात आलेली जप्तीची दिनांकही निघून तथा उलटून जाते. परीणामी पतसंस्थेची वसुली होत नाही. वसुली न झाल्या कारणे भविष्यात पतसंस्था अडचणीमध्ये येण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब विचारात घेता आम्हाला स्थावर तथा जंगम जप्तीकरीता जिल्ह्यात कुठेही जाण्यासाठी सशुल्क पोलीस बंदोबस्त पोलीस मुख्यालयामधून मंजूर करण्यात यावा यावा, अशी विनंती शिष्टमंडळाने केली असता, श्री. नोपानी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत थेट पो–लीस मुख्यालयातून तात्काळ पोलीस बंदोबस्त देण्याचा प्रयत्न करू, असा सकारात्मक प्रतिसाद श्री. नोपानी यांनी दिला. सदर निवेदनाची एक प्रत जिल्हा उपनिबंधकांनाही देण्यात आली आहे.

## अग्रलेख...

# बळीराजाच्या उन्नतीसाठी सप्तसूत्री

बळीराजा हा या जगाचा पोशिंदा असल्याने त्याची काळजी घेतलीच गेली पाहिजे. 'बळीराजा सुखी तर देश सुखी' ही वस्तुस्थिती असल्याने त्याच्या सुख-दुःखाची काळजी घेतली जाते आणि सरकार कोणत्याही देशातील असो, ते बळीराजाच्या सुख-समृद्धीसाठी काम करायला सिद्ध होते. त्यांच्यासाठी सोयी-सुविधांचे प्रावधान करते. भारतातील तत्कालीन राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने या पूर्वीच्या कार्यकाळात तीन कायदे आणून शेतकऱ्यांना दलालांच्या कचाट्यातून सोडविण्यासाठी पुढाकार घेतला होता. पण त्या कायद्यांना काही राजकारण्यांनी, खलिस्तानवाद्यांनी आणि पंजाब, हरयाणामधील कथित शेतकऱ्यांनी विरोध केल्याने सरकारला आपली पावले मागे घ्यावी लागली. त्यावेळी सरकार आंदोलनजीवींपुढे झुकल्याचे चित्र माध्यमांमध्ये रंगविले गेले आणि यापुढे हे सरकार आणि या सरकारचे धुरीण पुन्हा शेतकऱ्यांच्या बाबतीत काही करायला धजावणार नाही, अशी जगाची धारणाही करवून देण्यात आली. पण या सरकारने जणू बळीराजाचे उत्पन्न दुप्पट करण्याचा चंगच बांधलेला दिसतो. तिसऱ्या कार्यकाळात सत्ता स्वीकारताच या सरकारने पुन्हा एकदा शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी पावले उचलली असून त्यांच्यासाठी सप्तसूत्रीची घोषणा केली आहे. केंद्र सरकारने सोमवारी कृषी क्षेत्राशी संबंधित डिजिटल कृषी मिशनसह सात मोठ्या योजना राबविण्याचा निर्णय घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत देशातील कृषी क्षेत्राच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने, या योजनांसाठी १४ हजार कोटी रुपयांच्या तरतुदीलाही मंजुरी देण्यात आली. सन २०४७ पर्यंत देशातील कृषी विकास, अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेची पूर्वतयारी करण्यासाठीची ही कृषी सप्तसूत्री असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या सप्तसूत्रीअंतर्गत कृषी विकासासाठी अनेक उपाययोजनांचा अवलंब केला जाणार आहे. शेतीची उत्पादकता वाढवणे, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे आणि शाश्वतता सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सुधारित आणि उच्च दर्जाची बियाणे वापरून तसेच आधुनिक शेती तंत्र आणि उपकरणे स्वीकारून पिकांचे उत्पादन आणि गुणवत्ता सुधारण्यावर भर देण्यात येणार आहे. पारंपरिक सिंचन पद्धती बदलून आधुनिक आणि कार्यक्षम सिंचन पद्धती जसे ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाचा उपयोग करण्यावर यात भर दिला जाण्याची शक्यता आहे. माती परीक्षणावर आधारित खतांचा वापर करण्याची गरजदेखील प्रतिपादित केली जाऊ शकते. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयांची माहिती देताना, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी या योजना राबविल्या जातील, असे सांगितले. डिजिटल कृषी मिशन हे डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर आर्किटेक्चरच्या धर्तीवर विकसित केले जात आहे. २८१७ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह डिजिटल कृषी मिशनची स्थापना केली जाईल. कृषी शिक्षण आणि व्यवस्थापन कार्यक्रमासाठी २२९२ कोटी रुपयांची तरतूद केली जाईल. शाश्वत पशुधन आरोग्यासाठी १७०२ कोटी रुपयांच्या, फलोत्पादन विकासासाठी ८६० कोटी आणि कृषी विज्ञान केंद्रांसाठी १२०२ कोटी रुपयांच्या योजनांनाही मंजुरी देण्यात आली आहे. कृषी क्षेत्राशी संबंधित सात योजनांसाठी १३,९६० कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद करण्यात आली आहे. डिजिटल कृषी मिशनच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादकता, कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढविली जाणार आहे. या मिशनअंतर्गत शेतकऱ्यांना आधुनिक तांत्रिक साधने आणि सेवा प्रदान केली जाईल. यावरून बळीराजा चांगले निर्णय घेऊ शकेल आणि त्याचे कृषी उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवू शकेल. याअंतर्गत स्मार्ट कृषी तंत्रज्ञान अर्थात सेन्सर, ड्रोन आणि मशीन लर्निंग यासारख्या प्रगत साधनांचा वापर करून पिकांचे निरीक्षण केले जाईल. डेटा गोळा करून त्याचे विश्लेषण केले जाईल. कृषी डेटा प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव, पिकांचे रोग आणि खतांची माहिती सहज मिळू शकेल. ई-मार्केटिंगद्वारे शेतकऱ्यांना थेट बाजारपेठेशी जुळण्याची संधी मिळेल. यातून मध्यस्थांचे महत्त्व कमी करून, शेतकऱ्यांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळू शकेल. आर्थिक सेवांमधून शेतकऱ्यांना कर्ज, विमा आणि इतर आर्थिक सेवा डिजिटल बँकिंग आणि वित्तीय सेवांद्वारे सुलभ आणि सुरक्षित पद्धतीने पुरवल्या जातील. शेतकऱ्यांना डिजिटल माध्यमांद्वारे नवीनतम कृषी पद्धती आणि तंत्रांबद्दल माहिती आणि प्रशिक्षण मिळू शकेल. यामध्ये ऑनलाईन अभ्यासक्रम, वेबिनार आणि व्हिडीओ ट्यूटोरियल यांचा समावेश राहील. हवामानाचा अचूक अंदाज आणि सूचना डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे देण्याची तरतूद केली जाणार आहे. सोबतच शेतकऱ्यांना त्यांच्या पीक किंवा मातीशी संबंधित समस्या सोडविण्यासाठी डिजिटल सल्ला आणि हेल्प डेस्क सेवा पुरविल्या जातील. अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या भारतात मोठी आहे. शेती तोट्याचा सौदा ठरत असल्याने अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांनी शहराचा मार्ग धरला आहे. मात्र सप्तसंजीवनीसारख्या योजना शेतकऱ्यांच्या जीवनात नवी पहाट आणणाऱ्या ठरतील, याबाबत केंद्र सरकार आशादायी आहे. पंतप्रधानांनी देशाला जगातील तिसरी अर्थव्यवस्था म्हणून विकसित करण्याचा निर्धार केला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या पहिल्या कार्यकाळाच्या भारताची अर्थव्यवस्था जगात दहाव्या स्थावर होती. यादरम्यान आर्थिक क्षेत्रात करण्यात आलेल्या विविध प्रयत्नांतून आपण जगात पाचवी अर्थव्यवस्था म्हणून स्थान मिळविले. गेल्या काळात कृषी सन्मान निधीसारखा उपक्रम देशभरात राबविला जात आहे. यातून अल्प उत्पन्न गटातील अथवा अल्पभूधारक आणि आयकर न भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यात दर चार महिन्यांनी दोन हजार रुपये जमा होत आहेत. यातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडली असून गावगाड्यांच्या अर्थकारणावरही प्रभाव पडला आहे. अनेक गावे स्वावलंबी होण्याचा मार्ग यातून सुकर झाला आहे. शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या सप्तसूत्रीशिवाय अशा अनेक योजना निरनिराळ्या राज्य सरकारांनीही जाहीर केलेल्या आहेत. यातून त्यांना पशुपालनासाठी कर्ज, शेतीच्या वाहन खरेदीसाठी कर्ज, गुरांच्या आरोग्यासाठी, सिंचन व्यवस्थेसाठी तरतूद केली जाते. शेतकऱ्यांच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठीही राज्य सरकारांनी विशेष तरतूद केलेली दिसून येते. या साऱ्यात आता सप्तसूत्रीची भर पडली आहे. त्यातून शेतीचे आणि बळीराजाचे भले व्हावे, हीच अपेक्षा! ▮

## इतस्ततः

डॉ. विवेक राजे

# वक्फ ऐरणीवर येताना...

२०१५ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर सरकारने गावपातळीवर उद्योग, शाळा, दवाखाने, रेल्वे मार्ग या विकासात्मक कामांसाठी म्हणजे भूमी अधिग्रहणाकरिता एक कायदा आणण्यासाठी अध्यादेश जारी केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली २०१४ साली बहुमताने सत्तेत दाखल होऊनही भाजपाला सुधारित भूमी अधिग्रहण विधेयकावरून मोठा विरोध सहन करावा लागला होता. एका अध्यादेशाद्वारे केंद्र सरकारनं हे विधेयक आणलं होतं. या सुधारित कायद्यामुळे जमीन मालकाला योग्य मोबदला मिळू शकेल तसेच संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता येईल, असे मोदी सरकारचे म्हणणे होते. तसेच यामध्ये विस्थापितांच्या पुनर्वास आणि पुनर्स्थापनेचाही विचार केला होता. या अध्यादेशाला 'जमीन संपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापनेत पारदर्शकता आणि न्याय्य भरपाईचा कायदा-२०१५' असं नाव देण्यात आलं होतं. मात्र, होणाऱ्या तीव्र विरोधामुळे मोदी सरकारने हा कायदा मागे घेतला होता.

त्यानंतर २०२० मध्ये पंतप्रधान मोदी यांनी जे तीन कृषी कायदे आणले होते, ते त्यांच्या पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या टर्ममध्ये त्यांना मागे घ्यावे लागले होते. पहिला कायदा- शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य आणि सुविधा कायदा २०२०. या पहिल्या कायद्याचा उद्देश हा शेतकऱ्यांना खुल्या बाजारात, इतर राज्यांमध्येही त्यांचा शेतमाल बाजारपेठेत आणण्यास जे अडथळे येत होते ते दूर करण्याचा होता. दुसरा कायदा- शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा २०२०. हा कायदा शेती क्षेत्रात खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढून उत्पन्न व्यापार वाढावा यासाठी होता. तिसरा कायदा- अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा २०२०. हा कायदा अत्यावश्यक वस्तू कायदा सुधारणेचा होता. त्यात काही शेतमालाला (डाळी, कडधान्य, तेलबिया, कांदा आणि बटाटा) अत्यावश्यक वस्तूंच्या यादीमधून वगळण्याचे प्रावधान करण्यात आले होते. पंजाब, हरयाणा आणि उत्तरप्रदेश या फक्त तीन राज्यांमधील शेतकऱ्यांच्या या विषयांतील विरोधी भावनांची दखल घेत मोदी सरकारने हे तीनही कायदे परत घेतले होते. हे तथाकथित शेतकरी आंदोलन खलिस्तानी आणि राष्ट्र विघातक शक्तींद्वारा हायजॅक केले गेले आहे, हे स्पष्ट होऊनही या आंदोलकांवर कारवाई करण्याऐवजी हे फक्त शेतकऱ्यांचे आंदोलन असल्याने सरकारने तीनही कायदे मागे घेण्याचे पाऊल उचलले, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. त्यानंतर देशात बांगलादेशी व रोहिंग्या मुसलमानांची घुसखोरी थांबवणे आणि आधीच घुसखोरी केलेल्या बांगलादेशी नागरिकांना आणि रोहिंग्या मुसलमानांना हुडकून काढून त्यांची परत पाठवणी करण्याच्या उद्देशाने सीएए आणि एनआरसी लागू करण्यासाठी प्रयत्न केले गेले. दिल्लीला शाहीनबाग येथे राज्यमार्ग अडवून धरून काही महिने याच्या विरोधात मुस्लिम आंदोलकांनी जनतेची अडवणूक केली. दिल्लीला दंगल घडवून आणली गेली. आजही या कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी होताना दिसत नाही. वरील तिन्ही प्रसंगी सरकारने नमते घेतलेले दिसून येते. याला कारण म्हणजे एखाद्या विशिष्ट समाजघटकाला दुखावणे. वरील सगळ्याच प्रकरणात सरकारने टाळले, असे म्हणावे लागते. वास्तविक, कृषी कायद्याने बहुसंख्य शेतकऱ्यांचा फायदाच झाला असता, असे समजण्यास जागा आहे. सीएए आणि एनआरसी या देशात अत्यावश्यक आहेत. लोकसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ऑगस्ट महिन्यात मोदी सरकारकडून 'एकीकृत वक्फ प्रबंधन, सशक्तीकरण, दक्षता आणि विकास अधिनियम-१९९५' मांडण्यात आले आहे. या प्रस्तावित सुधारणा कायद्याला जॉईंट पार्लमेन्टरी कमिटीसमोर ठेवण्यास सरकार पक्षाने मान्यता दिली. या कायद्यावर समिती काम करून अहवाल सादर करेल. आता येणाऱ्या लोकसभेच्या अधिवेशनात यावर चर्चा होऊन त्याचे कायद्यात रूपांतर होण्याची बरीच शक्यता आहे. शक्यता आहे, असं म्हणण्याचे कारण असे की, वर दिलेल्या कायद्यांबाबतीत जे घडलं ते अधिक तीव्रतेने वक्फ संशोधन बिलाबाबत घडणार आहे, हे नक्की. विरोधी पक्ष वक्फमध्ये काहीही सुधारणा करण्याची गरज नाही, असेच म्हणणार आहेत. कारण तो त्यांच्या मतपेढीशी निगडित अतिसंवेदनशील मुद्दा असणार आहे. विरोधी पक्ष एकजुटीने लोकसभेच्या पटलावर या बिलाचा कडाडून विरोध करणार, हे निश्चित आहे.

सभागृहात बहुमताने पारित केलेले कोणतेही कायदे मागे घेण्यास आपण सरकारला निश्चितच भाग पाडू शकतो, असा आत्मविश्वास विरोधक, मुस्लिम समाज, खलिस्तानी आणि साम्यवादी वोक विचारसरणी यांना आलेला आहे. वक्फ कायदा संशोधन बिल केंद्राने रेटले तर हे सरकार, सरकारी यंत्रणा, हिंदू समाज आणि विविध हिंदू संघटनांच्या मनगटातील जोर आजमावला जाणार आहे, यात शंका नाही. सरकार आणि प्रशासकीय यंत्रणा यांना आपल्या मर्यादा असतात. त्यात नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू यांचे अत्यंत बेभरवशाचे, नीतिमत्ताशून्य, संधिसाधू पक्ष भाजपासोबत आहेत. त्यामुळे या बिलावर सरकारचा लोकसभेतच पराभव होऊ शकतो. तसे झाल्यास कदाचित आणखी सहाच महिन्यात मध्यावधी निवडणुका होण्याची दाट शक्यता आहे. या परिस्थितीचा विचार भाजपाचे शीर्ष नेतृत्व निश्चितच करीत असेल. पण जर विरोधी पक्ष, मुस्लिम समाज आणि सरकारात सामील असलेले नितीश आणि चंद्राबाबू यांना जखडून ठेवायचे असेल तर हिंदू समाजाला आपला वाटा उचलावाच लागेल. इथे विविध हिंदू संघटना तसेच हिंदुत्ववादी पक्ष आणि सत्तारूढ भाजपाला एकजुटीने आक्रमक भूमिका वठवावी लागेल. हे बिल संसदेत सादर होण्याअगोदरच राजकीय पक्ष म्हणून भाजपाने तर सामाजिक प्रश्न म्हणून विविध हिंदू संघटनांनी या बिलाच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरले पाहिजे. केवळ रस्त्यावर उतरून आंदोलने आणि बिलाला पाठिंबा देणारे मोर्चे काढून आज काम भागेल, असे वाटत नाही. त्यामुळे या बिलाला न्यायालयीन पाठिंबा कसा मिळेल याचाही विचार केला पाहिजे. जिथे हिंदुत्ववादी सरकारे आहेत तिथे वेगळा कृती कार्यक्रम तर जिथे इतर पक्षांची सरकारे आहेत तिथे वेगळी, पण थेट कृती करण्याची वेळ आलेली आहे. 'पुढच्याला ठेच मागचा शहाणा' या उक्तीप्रमाणे बांगलादेशच्या अनुभवाने हिंदू समाजाने एकत्र येत आक्रमक पवित्रा घेतला तरच हे बिल संसद पटलावर आल्यावर धडगत आहे. तेव्हा समाजानेच आपले संरक्षण करायचे असते, हे सत्य हिंदू समाजाने लक्षात ठेवलेले बरे. ▮

९८८१२४२२२४

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# हरयाणात आप आणि काँग्रेसची आघाडी होणार का?

हरयाणा विधानसभेची निवडणूक सध्या चर्चेत आहे. निवडणूक आयोगाने काही दिवसांपूर्वी या निवडणुकीची तारीख बदलली. हरयाणात आधी १ ऑक्टोबरला मतदान होणार होते. आता ते ५ ऑक्टोबरला होणार आहे. त्यामुळे हरयाणासोबत जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीची तारीखही बदलली आहे. दोन्ही राज्यांत ४ ऑक्टोबरऐवजी ८ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. हरयाणात गेल्या १० वर्षांपासून भाजपाची सत्ता आहे. त्यामुळे भाजपाला यावेळची निवडणूक जिंकत सत्तेवर येण्याची हॅट्‌ट्रिक करायची आहे तर काँग्रेसला आपला १० वर्षांचा सत्तेचा वनवास संपवायचा आहे. त्यामुळे दोन्ही पक्ष जिद्दीने कामाला लागले आहेत. राज्यात इतरही अनेक छोटे-मोठे पक्ष असले, तरी भाजपा आणि काँग्रेस हे दोनच प्रमुख पक्ष आहेत. विधानसभा निवडणुकीची लढतही खऱ्या अर्थाने या दोघांतच होणार आहे.

भाजपा आणि काँग्रेसने सुरुवातीला स्वबळावर निवडणूक लढवण्याची घोषणा केली होती. भाजपा अजूनपर्यंत आपल्या घोषणेवर ठाम आहे; मात्र काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढवण्याच्या घोषणेपासून घुमजाव करण्याच्या प्रयत्नात आहे. काँग्रेस आणि आप यांच्यात एकत्र निवडणूक लढवण्याबाबत चर्चा सुरू झाली आहे. येत्या एक-दोन दिवसांत या दोन पक्षात जागावाटपाची घोषणा झाली तर आश्चर्य वाटायला नको. हरयाणात काँग्रेस आणि आप अशी आघाडी झाली तर भाजपाची काही प्रमाणात अडचण होऊ शकते. विधानसभा निवडणुकीतील भाजपाचा विजय हा राज्यातील भाजपाविरोधी मतांच्या विभाजनावर खऱ्या अर्थाने अवलंबून आहे. सुरुवातीला काँग्रेस महासचिव के. सी. वेणुगोपाल आणि आपचे महासचिव संजयसिंह यांच्यात चर्चेच्या प्राथमिक फेऱ्या झाल्या. दोन्ही पक्षांतील नेत्यांनी आघाडीच्या चर्चेला दुजोरा दिला असला, तरी याबाबतचा अंतिम निर्णय मात्र काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे आणि राहुल गांधी तसेच आपचे राष्ट्रीय संयोजक आणि दिल्लीचे तुरुंगात असलेले मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या मंजुरीनंतरच होणार आहे. हरयाणा विधानसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेस यांच्यातील ही आघाडी सशर्त राहणार आहे. म्हणजे दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आप काँग्रेससोबत आघाडी करायला तयार असेल तर काँग्रेस हरयाणा विधानसभा निवडणुकीत आपसोबत आघाडी करू शकतो. कारण, हरयाणात आप कमजोर आहे, तर काँग्रेस मजबूत स्थितीत आणि दिल्लीत आप सशक्त आहे तर काँग्रेसची स्थिती दयनीय आहे. राजकीय भाषेत सांगायचे तर दिल्लीत आप हा मोठा भाऊ तर काँग्रेस हा लहान भाऊ आहे तर हरयाणात काँग्रेस हा मोठा भाऊ तर आप हा लहान भाऊ आहे. गेल्या दोन विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला दिल्लीत आपले खातेही उघडता आले नव्हते. त्यामुळे हरयाणात जशी आपला काँग्रेसची गरज आहे, तशीच दिल्लीत काँग्रेसला आपची. त्यामुळे दिल्लीत आप काँग्रेससाठी जागा सोडायला तयार असेल तर काँग्रेस हरयाणात आपला काही जागा देऊ शकतो. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंजाब वगळता दिल्ली, गोवा, हरयाणा आणि गुजरातमध्ये आप आणि काँग्रेस यांच्यात आघाडी झाली होती. हरयाणात आप आणि काँग्रेस यांच्यात झालेल्या जागावाटपाचा फायदा काँग्रेसला मिळाला. काँग्रेसने राज्यातील लोकसभेच्या दहापैकी पाच जागा जिंकल्या. आपला एकही जागा जिंकता आली नाही. राज्यातील भाजपाविरोधी मतांचे विभाजन रोखण्यासाठी काँग्रेसचे राहुल गांधी यांनी आपशी आघाडी करायची तयारी दाखवली. लोकसभा निवडणुकीत तयार झालेली इंडिया आघाडी येत्या विधानसभा निवडणुकीतही कायम ठेवायची त्यांची इच्छा आहे. त्यामुळे आपशी आघाडी करण्याच्या दृष्टीने काँग्रेसने पुढाकार घेतला. खरं म्हणजे हरयाणातील काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांचा विशेषतः राज्यातील ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुडा यांचा आपशी आघाडी करायला विरोध आहे. पण तो विरोध डावलून काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाने आपशी जागावाटपाची चर्चा सुरू केली. भाजपाविरोधी मतांचे विभाजन टाळण्यासाठी राहुल गांधी हरयाणात आपसोबत आघाडी व्हावी यासाठी आग्रही आहेत. असे करत इंडिया आघाडी पुढेही कायम ठेवत राष्ट्रीय राजकारणात आपली उदारमनाची प्रतिमा निर्माण करण्याचाही त्यांचा प्रयत्न आहे. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडी एकत्र लढल्यामुळे आपण भाजपाला २४० वर रोखले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही इंडिया आघाडी कायम ठेवली तर भाजपाला आपण रोखू शकतो, असा विश्वास राहुल गांधींच्या मनात निर्माण झाला आहे. हरयाणात आप आणि काँग्रेस यांच्यात आघाडी होणार का, अशी आघाडी झाली तर भाजपा तिचा प्रतिकार करण्यासाठी कोणती व्यूहरचना आखणार, यावर हरयाणा विधानसभा निवडणुकीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. ▮

९८८१७१७८१७

## वेध

विजय निचकवडे

# छत्रपतीही राजकारण्यांच्या वेठीस!

राजकारणात संधी शोधली जाते. संधी साधून राजकारण करताना ते चांगले की वाईट, याचा विचार होत नाही. केवळ त्यातून आपला हेतू साध्य होतोय् की नाही, याचे तेवढे मोजमाप केले जाते. ज्या छत्रपती शिवरायांनी स्वराज्य स्थापनेचा संकल्प पूर्णत्वास नेताना वेगवेगळ्या विचारांच्या व्यक्तींना एकत्रित आणून संकल्पपूर्ती केली, त्याच शिवरायांच्या पडलेल्या पुतळ्याचे राजकारण आज महाराष्ट्राला लाजिरवाणे करून सोडीत आहे. छत्रपतींच्या पुतळ्याचे राजकारण होऊ शकते, ही कल्पनाच मुळात महाराष्ट्रातील मराठी मनांना वेदनादायी अशी आहे. आज राजेही हा सर्व गोंधळ पाहून खजील झाले नसतील तरच नवल! राजकारणात सत्ताधारी आणि विरोधक हे द्वंद्व कायमच सुरू असते. डोळ्यात तेल घालून एकमेकांच्या चुका शोधण्याचे काम करणारे हे लोक संधी मिळताच तुटून पडतात. म्हणूनच मिळालेल्या संधीचे राजकारण करण्यात यांचा हातखंडा असतो. बरेचदा भूमिका बदलली की, शोधल्या जाणाऱ्या संधीचे स्वरूपही बदलते. सध्या महायुती आणि महाविकास आघाडी असे रण महाराष्ट्रात पेटले आहे. विधानसभेची निवडणूक समोर उभी ठाकली आहे. निवडणुकीचे वेध सगळ्याच राजकीय पक्षांना लागले असल्याने मिळेल ती संधी सार्थकी लावण्याचा प्रयत्न केला जातो आहे. मात्र, हे करताना आमचे राजकारणी आपण महाराष्ट्राच्या आराध्यांनाच वेठीस धरतो आहोत, हे स्वीकारण्यास तयार नाहीत. राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळला. राजेंचा पुतळा कोसळणे नक्कीच महाराष्ट्रातील तमाम मराठी मनांना वेदना देणारी घटना आहे. जे यासाठी दोषी असतील, ते नक्कीच क्षमापात्र नाहीत. घटना झाल्यानंतर विरोधक म्हणून मागणी झाली. शासनाने समिती गठित करून संबंधितांवर गुन्हेही दाखल केले. आता नियमानुसार कायदेशीर कारवाई होईलच. पण हे होत असतानाच जर या घटनेकडे राजकारणाच्या चष्म्यातून पाहिले जात असेल तर शिवाजी महाराज आमचे आराध्य म्हणविणाऱ्या आणि आपल्या भाषणाची सुरुवातच 'महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज,' अशी करणाऱ्यांना खरंच विचार करण्याची गरज आहे. विरोधक म्हणून मविआच्या नेत्यांनी बरेच काही केले. पुतळा उभारणीच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप झाला. सत्तेतील नेत्यांच्या फोटोंना जोडे मारून आपला संताप व्यक्त केला. यावर त्यांच्या हिमतीला दुसरीकडून आव्हानही देण्यात आले. हा भाग निराळा की, यात विरोधकांमधील एक असलेल्या हातात भगवा घेणाऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनीही काम केल्याचे नाव चर्चेत आले. इथपर्यंत ठीक होते; मात्र पडलेल्या पुतळ्याचे राजकारण करून विधानसभेत आपण किती जागा जिंकू, असे सर्वेक्षण करण्यापर्यंत जर मजल विरोधकांची जात असेल तर मात्र यापेक्षा क्षुद्र राजकारण नसूच शकते. पडलेला पुतळा ही दुर्दैवी घटना आहे; पण त्यापेक्षाही त्याचे होत असलेले राजकारण हे दुर्दैवी म्हणावे लागेल. मविआकडून पुतळा पडल्याच्या घटनेनंतर एक सर्वेक्षण करण्यात आल्याची चर्चा आहे. घटनेनंतर विधानसभा निवडणूक झाल्यास मविआला किती जागा मिळू शकतात, या घटनेचा कसा राजकीय फायदा विरोधकांना मिळू शकतो, या दृष्टीने झालेला सर्व्हे आता चर्चेत आला आहे. या सर्वेक्षणानंतर विरोधकांवर सत्ताधारी पक्षांकडून टीकाही झाली. घटनेचे राजकारण करून त्याचा राजकीय फायदा मिळविण्याच्या दृष्टीने विरोधकांची सुरू असलेली धडपड या निमित्ताने उघड झाली; सोबतच त्यांच्या छत्रपतींवरील प्रेमाचे खरे वास्तवही पुढे आले. सत्ताधाऱ्यांना विरोध करणे विरोधकांचे काम आहे. विरोध व्हायलाच हवा; मात्र तो करताना तारतम्य बाळगले गेल्यास राजकीय पक्षांच्या शिवरायांवरील स्वार्थी प्रेमाचे दर्शन तरी किमान महाराष्ट्रातील मराठी माणसांना होणार नाही, मग तो पक्ष कोणताही का असो ना... ▮

९७६३७१३४१७

## वाचक पत्रे

### आंदोलन की फडणवीस हटाव?

गेल्या काही काळातील मनोज जरांगेंची वक्तव्ये बघितली तर 'मराठा आरक्षण' आणि 'फडणवीस हटाव' यापैकी त्यांचे प्रमुख ध्येय काय आहे, हे लक्षात येते. रोजच्या रोज जरांगे अगदी ठरवल्याप्रमाणे महाराष्ट्राचे एक उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य करीत आहेत. अत्यंत जहरी शब्दांत, खालच्या पातळीवर जाऊन, त्यांच्यावर वैयक्तिक टीका करीत आहेत. जणू काही फडणवीसच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दुसरे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव घेणेही ते हेतुपुरस्सर टाळत आहेत. जरांगे असे का करत आहेत, ते जनता जाणून आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जरांगेंना मराठा आरक्षणापेक्षा देवेंद्र फडणवीस यांना हटवण्यातच जास्त रस आहे. जरांगेंच्या अशा वक्तव्यांना मराठी प्रसारमाध्यमांनीही उचलून धरले आहे. वास्तविक, देवेंद्र फडणवीस हे नरेंद्र मोदी यांच्याप्रमाणेच स्वच्छ प्रतिमा असलेले कार्यक्षम नेते आहेत. त्यांच्यावर टीका करणाऱ्या विरोधी पक्षातील एकाही नेत्याची प्रतिमा, कार्यक्षमता, हितसंबंध आणि जनहिताची चिंता तशी नाही. मराठा आरक्षणासाठी देवेंद्र फडणवीस यांनी जेवढे प्रामाणिक प्रयत्न केले तेवढे प्रयत्न महाराष्ट्रातील दुसऱ्या कोणत्याही नेत्याने केले नाही, हे सत्य आहे. फडणवीसांबरोबर वैचारिक, बौद्धिक मुद्यांवर आधारित चर्चा करण्याची क्षमता नसल्यामुळे मविआचे नेते आणि जरांगे हीन जातीयवादी राजकारण खेळत आहेत. काही मराठी प्रसारमाध्यमेसुद्धा फडणवीसांना बदनाम करण्यासाठी आकाशपाताळ एक करत आहेत.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

### आम्हालाही भाऊ आहे हो...

नुकताच रक्षाबंधनाचा सण झाला. माहेरवाशिणी माहेरची ओटी घेऊन परत कामाला लागल्या आहेत. याच सणाला कित्येक स्त्रियांनी शत्रूला राखी बांधून स्वतःचे, देशाचे रक्षण केले आहे. आता तर भगिनी सैनिकांना, कैद्यांना, पंतप्रधानांना राखी बांधतात. झाडांनासुद्धा राखी बांधणाऱ्या भगिनी आहेत. मग मोलकरीण का नाही भावाकडे जाणार? प्रत्येक कुटुंबात कामवालीला मानाचे स्थान आहे. गृहिणींचा मोलकरीण म्हणजे उजवा हात. त्यांच्या भरवशावर घर, मुले टाकून नोकरीवर जातात. मग त्यांचे थोडे ऐकायला हवं. राखीबंधनाला जाण्याची आनंदाने परवानगी द्यावी. नंतर जा, पैसे कापू असं म्हणण्याचा आम्हाला अधिकार नाही. सणाला, भावनेला महत्त्व आहे. खूप बायका, रक्षाबंधनाला आली नाही, आमची गैरसोय झाली म्हणून चिडतात. काही जणींनी त्यांना कामावरून कमी केले. तुमच्या कामावर त्यांचा संसार, मुलांचे शिक्षण अवलंबून आहे. स्त्री स्त्रीची वैरीण नसून मैत्रीण, सखी मानायला हवे, त्यांनाही भावना आहेत. त्यात लाडकी बहीण योजनेमुळे चार पैसे हातात आहेत. त्यांच्या गरिबीचा फायदा घेऊ नका. त्या म्हणतात, 'आमाला बी भाऊ आहे. राखी बांधण्याचा आमचा हक्क आहे. तुमच्याप्रमाणे आम्हालाही भाऊरायाची ओढ, माया, प्रेम आहे. तुम्ही आम्हाला जपा, आम्ही तुम्हाला...' एकमेकांचा भाव जपा. प्रत्येक सण एकमेकांना सांभाळून समजून साजरा करू या!

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

●● ●●

### आधी पक्ष तर दुरुस्त करा!

जनतेच्या मनावर राज करण्याचे सामर्थ्य या ठाकरेजवळ आहे. उत्तम असे भाषण ठोकणारा, वेळोवेळी सडेतोड भूमिका घेणारा, कणखर असा ठाकरे कोणी असेल तर तो राज ठाकरे. पण या ठाकरेंना आता राज साहेब होते असेच म्हणावे लागेल. कारण की पक्ष स्थापन होऊन कित्येक वर्षे झाली, पण महाराष्ट्राच्या राजकारणात अजूनही पकड नाही. नुसते षण्मुखानंदमध्ये भाषणे देऊन होणार नाही. मुंबईत उबाठाला टक्कर केवळ राजसाहेब देऊ शकतात, हे भाजपालाही माहीत आहे; पण खुद्द राजसाहेबांना माहीत नाही. कारण की त्यांनी पक्षवाढीसाठी काहीच ठोस भूमिका घेतली नाही. येणाऱ्या विधानसभेत सर्वत्र उमेदवार देऊ म्हणाले तर खरे; पण ते कसं शक्य आहे? कोणीही थातूरमातूर उभे करणे म्हणजे उमेदवार देणे नव्हे. जनतेत कुठेच कार्य होताना दिसत नाही या पक्षाचं. नागपुरात ते म्हणाले की, ४८ तासांत महाराष्ट्र दुरुस्त करतो! हे एक टाळ्या घेणारं वाक्य आहे; यापलीकडे काहीच नाही. कारण राजसाहेबांना खरी गरज आज पक्ष दुरुस्त करण्याची आहे, मग महाराष्ट्र. लवकरच निवडणुका आहेत. अजूनही मनावर घेतले पाहिजे. कारण मुंबईत राजसाहेब चालले की महाराष्ट्रात लाडके भाऊ पुन्हा सत्तेवर येऊ शकतात. ▮

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## वर्तमान

**विनोद बन्सल**

# विहिंपची ६० वर्षे; यश आणि आव्हाने

देशाच्या राजकीय स्वातंत्र्यानंतर, तथाकथित सेक्युलॅरिझमच्या नावाखाली हिंदू समाजावरील वाढता अन्याय आणि ख्रिश्चन आणि मुस्लिमांचे वाढते तुष्टीकरण या पृष्ठभूमीवर १९५७ मध्ये नियोगी आयोगाचा अहवाल देशापुढे आला. ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून होणारी गरीब हिंदूंची फसवणूक तसेच कपट-कटकारस्थान करून, आमिष दाखवून देशभरातील हिंदूंचे होत असलेले धर्मांतर या सर्व बाबींवर नियोगी आयोगाच्या अहवालात झगझगीत प्रकाश टाकण्यात आला होता. मात्र, या अहवालात हे कटुसत्य परखडपणे नमूद केल्यानंतरही तत्कालीन केंद्र सरकारने धर्मांतराविरुद्ध देशव्यापी कायदा करण्यास स्पष्टपणे नकार दिला. दुसरीकडे परदेशात राहणारा हिंदू समाजही आपल्या विविध समस्यांच्या सोडवणुकीसाठी भारताकडे वळला. मात्र केंद्र सरकारच्या उदासीन वृत्तीने या परदेशस्थ हिंदूंचीही घोर निराशा केली. अशा परिस्थितीत हिंदू समाजाला संघटित करण्यासाठी आणि धर्माचे रक्षण करण्यासाठी आणि हिंदू धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनमूल्यांचे रक्षण करण्यासाठी साठ वर्षांपूर्वी, जन्माष्टमीच्या दिवशी (इंग्रजी तारखेनुसार २९ ऑगस्ट १९६४) रोजी विश्व हिंदू परिषदेची स्थापना करण्यात आली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक आणि हिंदुस्थान समाचारचे संस्थापक दादासाहेब आपटे यांच्या सोबत श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभमुहूर्तावर, पवई, मुंबई येथील पूज्य स्वामी चिन्मयानंदजी यांच्या आश्रमातील सांदीपनी साधनालयात, पूज्य स्वामी चिन्मयानंद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, शीख संप्रदायाचे माननीय मास्टर तारासिंह, जैन संप्रदायातील पूज्य सुशीलमुनी, गीताप्रेस गोरखपूरचे हनुमानप्रसाद पोद्दार, के. एम. मुन्शी आणि रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक प. पू. श्रीगुरुजी यांच्यासह ४०-४५ मान्यवरही याप्रसंगी उपस्थित होते.

याच बैठकीत हिंदू समाजाला संघटित करून जागृत करणे, त्याचे स्वत्व, मानबिंदूंचे आणि जीवनमूल्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे आणि विदेशी हिंदूंशी संपर्क प्रस्थापित करून त्यांना बळकटी देणे आणि मदत करणे ही विश्व हिंदू परिषदेची तीन मुख्य उद्दिष्टे ठरविण्यात आली. 'जी व्यक्ती भारतात विकसित झालेल्या जीवनमूल्यांवर विश्वास ठेवते अथवा जी व्यक्ती स्वतःला हिंदू म्हणविते ती हिंदू आहे, अशी 'हिंदू' या शब्दाची व्याख्या करण्यात आली. २२ ते २४ जानेवारी १९६६ या कालावधीत कुंभमेळ्याच्या निमित्ताने प्रयागराज येथे १२ देशांतील २५ हजार प्रतिनिधींच्या सहभागासह प्रथम हिंदू संमेलन पार पडले. यामध्ये ३०० प्रमुख संतांसह प्रथमच मुख्य शंकराचार्य देखील एकत्र आले आणि धर्मांतर थांबवून परधर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात आणण्याचा (घरवापसी) ठराव घेण्यात आला. म्हैसूरचे महाराजा आदरणीय चामराजजी वाडियार यांना प्रथम अध्यक्ष आणि दादासाहेब आपटे यांना पहिले सरचिटणीस घोषित करून विहिंपच्या व्यवस्थापकीय समितीचीही घोषणा करण्यात आली. या परिषदेत परावर्तन अर्थात घरवापसीचा ऐतिहासिक प्रस्ताव पारित करण्यात आला. तसेच विश्व हिंदू परिषदेचे बोधवाक्य 'धर्मो रक्षति रक्षितः आणि 'अक्षय वटवृक्ष' हे बोध चिन्ह म्हणून निश्चित करण्यात आले.

जर देशातील संत-महात्मांनी एकत्र येऊन अस्पृश्यतेला हिंदू धर्मग्रंथात स्थान नाही, असे जाहीरपणे घोषित केले तर अस्पृश्यता नष्ट करता येऊ शकते, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. हे लक्षात घेऊन १३-१४ डिसेंबर १९६९ च्या उडुपी येथील धर्मसंसदेत रा. स्व. संघाचे तत्कालीन सरसंघचालक श्रीगुरुजींच्या विशेष प्रयत्नांचे फलित म्हणून, भारतातील प्रमुख संतांनी एकस्वरात 'हिन्दवः सोदरा सर्वे, ना हिंदू पतितो भवेत्' या उद्घोषासह सामाजिक समरसतेचा ऐतिहासिक ठराव एकमताने पारित केला.

१९९४ मध्ये काशी येथे झालेल्या धर्मसंसदेचे निमंत्रण डोम राजांना देण्यासाठी पूजनीय संत केवळ त्यांच्या घरीच गेले नाहीत तर त्यांनी त्यांच्याघरचा प्रसादही स्वीकारला. दुसऱ्या दिवशी डोम राजे धर्मसंसदेच्या अधिवेशनात संतांच्या निकट बसले. यावेळी सर्व मान्यवर संतांनी त्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले. या धर्मसंसदेत ३५०० संत उपस्थित होते. वनवासी, जनजाती, अतिमागास आणि मागासलेल्या जातीच्या हजारो लोकांना ग्रामपुजारी म्हणून प्रशिक्षण देऊन त्यांचा वेळोवेळी सत्कार आणि मंदिरात पुरोहित-पुजारी म्हणून त्यांची नियुक्ती हे केवळ विहिंपच्या ग्राम पुजारी प्रशिक्षण अभियानामुळेच शक्य झाले.

९ नोव्हेंबर १९८९ मध्ये श्रीरामजन्मभूमीचा शिलान्यास एक अनुसूचित जातीचे कार्यकर्ते कामेश्वर चौपाल यांच्याहस्ते करण्याबरोबरच अनेक योजना व कार्यक्रम राबविण्यात आले. यात देशभरात आयोजित समरसता यज्ञ, समरसता यात्रा, समरसता चर्चासत्रे, हिंदू परिवार मित्रयोजना, अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे इत्यादी अनेक योजना व कार्यक्रमांच्या माध्यमातून हिंदू समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दिशेने अभूतपूर्व कार्य केले आहे. सन २००३ पासून देशभरात सातत्याने भगवान वाल्मीकि, संत रविदास, तथा घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महापुरुषांची जयंती मोठ्या प्रमाणावर साजरी केली जात आहे. या सर्व कार्यक्रमांचा सकारात्मक परिणाम म्हणून संत समाज आता सहजपणे वंचित भागात प्रवास, प्रवचन, कीर्तन व सहभोजन अगदी सहजपणे कलतो.



द्वितीय विश्व हिंदू संमेलन देखील प्रयागराजच्या पुण्यभूमीवर २७ ते २९ जानेवारी १९७९ दरम्यान पार पडले. या संमेलनात १८ देशांमधील ६० हजार प्रतिनिधी सहभागी झाले होते. संमेलनाचे उद्घाटन पूज्य दलाई लामा यांच्या हस्ते झाले आणि त्यांचे स्वागत ज्योतिषपीठाच्या शंकराचार्यांनी केले. हा देखील एक ऐतिहासिक प्रसंग होता.

२७ ते २९ मार्च १९७० मध्ये आसाम राज्यातील जोरहाट येथे देशातील वनवासी, दऱ्याखोऱ्यांत-पहाडांवर राहणारे गिरिवासी तसेच वनात राहणारे जनजाती बंधू आणि शहरवासी यांचा विराट मेळावा आयोजित करण्यात आला होता. देशातील सर्व प्रमुख तीर्थक्षेत्रे आणि ४५ नद्यांच्या पाण्याने एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या संमेलनात अनेक पूजनीय संत-महंत व ईशान्य भारतातील अनेक विचारवंत व बुद्धिजीवी सहभागी झाले होते.

'ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या जाळ्यात अडकलेला निसर्गपूजक वनवासी समाज हा हिंदू समाजाचाच एक अविभाज्य भाग असल्याची महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक घोषणा नागाराणी गाइडिन्ल्यु यांनी केली.

१९८२ मध्ये अशोक सिंघल विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी झाले. व्यापक जनजागृतीचे कार्यक्रम संपूर्ण देशभरात होऊ लागले. १९८३ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या एकात्मता यात्रेत तर देशातील तब्बल ६ कोटी लोक सहभागी झाले होते. एप्रिल १९८४ मध्ये नवी दिल्लीत प्रथम धर्म संसदेचे अधिवेशन पार पडले. समाजाच्या सहकार्याने विश्व हिंदू परिषदेतर्फे देशभरात ४५०० हून अधिक सेवाप्रकल्प राबविले जात आहेत. यात ३१ प्रांतातील ९३ हजार ठिकाणी ८४० संस्कार शाळांमध्ये १७ हजार मुले शिक्षण घेत आहेत. याशिवाय प्राथमिक आरोग्य केंद्रे, स्वावलंबन केंद्र, निवासी वसतिगृहे, अनाथाश्रम, वैद्यकीय केंद्रे, संगणक, शिवणकाम, भरतकाम प्रशिक्षण तसेच विवाह केंद्र इत्यादींचा प्रामुख्याने समावेश आहे.



विश्व हिंदू परिषदेने गोरक्षण, गोपालन आणि गोसंवर्धन क्षेत्रात अनेक कामे केली आहेत. देशातील ६० स्थानांवर गोवंशाच्या मूळ जातींचे संवर्धन, ४० ठिकाणी पंचगव्य आधारित औषधी उत्पादन केंद्रे आणि तीन पंचगव्य संशोधन केंद्रे सध्या देशात कार्यरत आहेत. २५ लाख गोवंशांची कसायांच्या तावडीतून सुटका, अनेक राज्यांमध्ये गोवंश हत्येच्या विरोधात कठोर कायद्याची तरतूद आणि 'गोपालनातून स्वावलंबनाकडे' या योजनेअंतर्गत पाच गायींसह मासिक ५० हजार रुपये उत्पन्न तसेच गोवंश आधारित कर्जमुक्त व कृषी आणि रोजगारयुक्त युवकांच्या दिशेने विहिंपने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. अनेक राज्यांमध्ये गोरक्षणासाठी कठोर कायदेही करण्यात आले आहेत.

विश्व हिंदू परषदेने बेकायदेशीर धर्मांतर रोखण्यासाठी आणि धर्मांतरित हिंदू बंधू-भगिनींना पुन्हा स्वधर्मात (घरवापसी) घेण्यासाठी मोठे काम केले आहे. आतापर्यंत सुमारे ४० लाख हिंदू बंधू-भगिनींचे धर्मांतर थांबवण्याबरोबरच सुमारे ९ लाख लोकांना पुन्हा स्वधर्मात आणले आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, वनवासी आणि गिरिजन समुदायांमध्ये सेवा, समर्पण आणि स्वावलंबनाच्या मंत्रासह विहिंप असंख्य प्रकल्प राबवित आहे. संघटनेच्या या सततच्या प्रयत्नांमुळे अनेक राज्यांमध्ये फसवणूक करून धर्मांतर करणाऱ्यांना कठोर शिक्षा देणारे कायदे करण्यात आले आहेत. तसेच आठ हजार हिंदू भगिनींना 'लव्ह जिहाद'च्या संकटातून वाचविण्यात आले.

भारत हा धर्मक्षेत्रांचा, तीर्थक्षेत्रांचा देश आहे. ही धर्मक्षेत्रे, तीर्थक्षेत्रे म्हणजे जणू देशाचा आत्मा आहे. या तीर्थयात्रांच्या माध्यमातूनच देश, धर्म आणि समाजाची एकता, अखंडता आणि समरसता प्रतिबिंबित होते. कांवड यात्रा असो वा कैलास मान सरोवर, अमरनाथ यात्रा असो किंवा गोवर्धन परिक्रमा, जगन्नाथाची नव कलेवर यात्रा असो किंवा सिंधू दर्शन यात्रा, श्रीराम जानकी विवाह मिरवणूक असो की बाबा अमरनाथची यात्रा असो या सर्वांना सहज, यशस्वी, सुखद, आनंददायी, संस्कारित आणि आध्यात्मिक स्वरूप देण्यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या धर्मयात्रा महासंघाने १९९५ सालापासून एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. शासन-प्रशासन आणि संबंधित सरकार यांच्याशी सातत्याने संपर्क साधून या यात्रा कशा व्यवस्थित पार पडतील, यादृष्टीने कार्य केले आहे. तसेच कालौघात बंद पडलेल्या अनेक यात्रा पुन्हा नव्याने सुरू केल्या आहेत.

'वसुधैव कुटुम्बकम' ची संकल्पना घेऊन विदेशात वसलेल्या हिंदू समाजाचे संरक्षण, संस्कार व त्यांच्यातील हिंदू जीवनमूल्ये जिवंत ठेवण्यासाठी विहिंपने अनेक पावले उचलली आहेत. जगाच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या हिंदूंचा आवाज म्हणून विहिंपचे कार्यकर्ते नेहमीच आघाडीवर राहिले आहेत. याच कारणास्तव विहिंपने अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, फिजी, न्यूझीलंड, डेन्मार्क, थायलंड, इंडोनेशिया, तैवान, श्रीलंका, नेदरलँड, सिंगापूर, नेपाळ, जर्मनी इत्यादी देशांमध्ये अनेक स्थानिक आणि जागतिक स्तरावरील कार्यक्रमांचे आयोजन यशस्वीपणे केले आहे आणि यापैकी बहुतांश देशांमध्ये हिंदू सण, पारंपरिक उत्सव मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात.

आपल्या ६० वर्षांच्या विकास यात्रेत विहिंपने अनेक जनजागृती मोहिमा राबविल्या, ज्या जागतिक विक्रम बनल्या. १९८४ मध्ये सुरू झालेल्या श्रीरामजन्मभूमी मुक्ती आंदोलनाने देशातील ६५ कोटी लोकांना जोडले. 'सडक ते संसद' व सर्वोच्च न्यायालयापर्यंत आवाज बुलंद करून ४९६ वर्षांच्या संघर्षानंतर देशाच्या स्वाभिमानाचे पुनरुज्जीवन करून, २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत रामललाची प्राणप्रतिष्ठा करून हा ऐतिहासिक दिवस सुवर्णाक्षरांनी नोंदवला.

१९९५ मध्ये जिहादी दहशतवाद्यांनी बाबा अमरनाथ यात्रा बंद करण्याची धमकी दिली तसेच 'जर कोणी यात्रेत सहभागी झाले तर ते जिवंत परत जाणार नाहीत' अशीही धमकी दिली. तेव्हा बजरंग दलाने हे आव्हान स्वीकारले. बजरंग दलाच्या हाकेला ओ देत ५१ हजार बजरंगी आणि एक लाख अन्य शिवभक्तांनी 'हर हर महादेव'ची गर्जना करीत त्या दुर्गम यात्रेच्या दिशेने वाटचाल सुरू केली तेव्हा ती थांबवण्याची हिंमत कुणालाही झाली नाही. आजपर्यंत यात्रा थांबविण्याचे धाडस कोणीही केलेले नाही. जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील सीमावर्ती क्षेत्राला हिंदू विहीन करण्याच्या जिहादी कारस्थानाची जाणीव होऊन बजरंग दलाने २००५ मध्ये बाबा अमरनाथ यात्रा पुन्हा सुरू केली तेव्हा तेथील हिंदूंचे पलायनही थांबले तसेच समाजाचा आणि सुरक्षा जवानांचाही आत्मविश्वास देखील वाढला. याशिवाय मेवातमधील नलहड महादेव यात्रा, कर्नाटकातील दत्त पीठ यात्रा आणि अयोध्येतून जनकपूरला जाणारी 'श्रीराम-जानकी बारात यात्रा' देखील सामाजिक समरसता आणि एकात्मतेची भावना जागृत करीत आहेत.

भगवान श्रीरामांच्या आदेशानुसार नल व नील यांनी दक्षिणेत बनविलेला राम सेतू तोडण्याचा निर्णय तत्कालीन केंद्रातील काँग्रेसप्रणीत संपुआ सरकारने घेतला होता. सरकाला या निर्णयापासून माघार घेण्यास भाग पाडण्यासाठी विहिंपने प्रचंड जनआंदोलन केले होते. तत्कालीन केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात भगवान श्रीरामाचे अस्तित्वच नाकारले तेव्हा विहिंपने केलेल्या अवघ्या चार तासांच्या देशव्यापी चक्काजाम आंदोलनाने सरकार पार हादरून गेले व त्याच दिवशी केंद्र सरकारने रामसेतूबाबतचा आपला निर्णय मागे घेतला. दिल्लीच्या सुवर्णजयंती उद्यानात उपस्थित लाखो राम भक्तांच्या वादळापुढे सरकारच्या वल्गना पार हवेतच विरल्या.

विहिंपची युवा शाखा असलेल्या बजरंग दल आणि दुर्गा वाहिनीने १९८४ पासून आजपर्यंत देव-धर्म-संस्कृती व राष्ट्राच्या रक्षणासाठी नेहमीच अग्रणी भूमिका बजावली आहे. सेवा, सुरक्षा आणि संस्कार हा या संघटनांचा मूलमंत्र आहे. संस्कृत भाषा, वेद पाठशाळा आणि संस्कार संवर्धनासाठीही विहिंपने अनेक पावले उचलली आहेत. हे सर्व असूनही धर्मांतरण, लव्ह जिहाद, सामाजिक समरसता, धर्मस्थळांची सुरक्षा आणि सरकारी अधिग्रहणातून मुक्ती, संस्कृती आणि मूल्यांचा ऱ्हास, धार्मिक शिक्षण आणि जागृतीचा अभाव, विदेशी घुसखोरी, लोकसंख्या असंतुलन इत्यादी अनेक आव्हाने आमच्यापुढे आहेत. या समस्यांचा सामना करीत हिंदू समाजाला त्यांच्यापासून मुक्त करणे करणे आवश्यक आहे.

*(लेखक विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ते आहेत.)*

## संस्कृती

**रविकुमार अय्यर**

भाग १

# हिंदू संस्कृतीचा विश्वसंचार



हिंदू धर्माचे जगभरात अंदाजे १.२ बिलियन (१२० कोटी) अनुयायी आहेत. हे प्रमाण जगाच्या लोकसंख्येच्या १५ टक्के आहे. ख्रिश्चन धर्म (३१.५ टक्के) आणि इस्लाम धर्मानंतर (२३.३ टक्के) नंतर हिंदू हा जगातील तिसरा सर्वांत मोठा धर्म आहे. परंतु, जगभरात केवळ दोनच हिंदूबहुल देश आहेत. एक म्हणजे १०० कोटींहून अधिक हिंदू असलेला भारत आणि दुसरा म्हणजे दोन कोटी हिंदू असलेला नेपाळ. हे दोनच देश हिंदूबहुल आहेत. तर बांगलादेश (१.४ कोटी), पाकिस्तान (५२ लाख), इंडोनेशिया (५० लाख, बालीत ८७ टक्के हिंदू), अमेरिका (३३ लाख), श्रीलंका (२६ लाख), मलेशिया (२० लाख), युनायटेड किंगडम (१० लाख), म्यानमार (नऊ लाख), कॅनडा (आठ लाख), ऑस्ट्रेलिया आणि मॉरिशस (प्रत्येकी सात लाख), दक्षिण आफ्रिका (पाच लाख), संयुक्त अरब अमिरात (पाच लाख), जर्मनी (१ लाख ३० हजार) इत्यादी हिंदूंची मोठी लोकसंख्या असलेले देश आहेत.

परदेशातील हिंदूंनी जगभरात हजारो मंदिरांची उभारणी केली आहे. ज्यात मुलांना संस्कृत श्लोक शिकवण्यासाठी तसेच हिंदी, पंजाबी, बंगाली, मराठी, गुजराती, तामिळ, कन्नड आणि तेलुगु या भारतीय भाषा शिकविण्यासाठी साप्ताहिक वर्ग भरवले जातात. अनेक मंदिरांमध्ये साप्ताहिक संस्कार वर्ग, अभ्यास वर्ग चालतात. अनेक ठिकाणी श्रीमद् भगवद् गीता, वेद, उपनिषद, रामायण, महाभारतावर आधारित ग्रंथांचा अभ्यास या वर्गांच्या माध्यमातून केला जातो. मुलांच्या भल्यासाठी अनेक भारतीय शाळा चालवल्या जातात आणि साडी, कुर्ता-पायजामा इत्यादी भारतीय पोशाखांना मोठी मागणी आहे. भारतीयांच्या चवींची पूर्तता करणारी हजारो प्रोव्हिजन स्टोअर्स आणि रेस्टॉरंट्स आहेत. हिंदी आणि तमिळ चित्रपटांची 'क्रेझ' केवळ परदेशी भारतीयांमध्येच नाही तर अरब, मलेशिया, थाई आणि इतर राष्ट्रांतील लोकांमध्येही आहे. फिल्मस्टार रजनीकांत (आणि त्याचे चित्रपट) जपानी नागरिकांमध्ये चांगलाच लोकप्रिय आहे. जपानी युवकांना तर अनेक तामिळ चित्रपटांचे संवाद पंच-लाईन मुखोद्गत आहेत.

### परदेशस्थ हिंदू साजरा करतात 'थाई पुसम'

'थाई पुसम' हा तामिळ सण केवळ भारतातील आठ कोटी तामिळ हिंदूच नव्हे तर मलेशिया, सिंगापूर, इंडोनेशिया, फिजी, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका, रियुनियन बेट आणि मॉरिशस येथे राहणारे ८० लाख तामिळ हिंदू दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात साजरा करतात. प्रत्यक्ष सणाच्या दिवसाच्या ४८ (एक मंडळ) दिवस आधी या सणाची तयारी सुरू होते. या ४८ दिवसांमध्ये, भक्त दैनिक प्रार्थना सत्र आयोजित करतात, लैंगिक संबंधांपासून दूर राहतात आणि आपले शरीर आणि मन शुद्ध करण्यासाठी केवळ शाकाहारी भोजनच करतात. भगवान कार्तिकेयाला गायीच्या दुधाचे एक भांडे अर्पण केले जाते. काही भक्त त्वचा, जीभ किंवा गालावर वेल (शूल) टोचून प्रायश्चित घेतात. या ४८ दिवसांत पिवळे किंवा भगवे वस्त्र परिधान केले जाते कारण हे रंग शुद्धता, पावित्र्य आणि भक्तीचे प्रतीक आहेत. या वेळी मलेशियातील क्वालालंपूरजवळील बाटू लेणी येथील भगवान षणमुगा मंदिरात २० लाखांहून अधिक तामिळ हिंदू आणि पर्यटक गर्दी करतात. यामुळे हा दक्षिण-पूर्व आशियातील सर्वात मोठा वार्षिक मेळावा ठरला आहे. मंदिरात भगवान मुरुगनची १४० फूट उंच मूर्ती आहे, जी मलेशियातील सर्वात उंच मूर्ती आहे. येथील कार्तिकेयचा पुतळा देखील जगातील सर्वात उंच पुतळ्यांपैकी एक आहे.

तसे पाहता मलेशियाचा अधिकृत धर्म इस्लाम आहे आणि शरिया कायद्यांची व्याख्या व अंमलबजावणी करून हिंदूंच्या तसेच अन्य धर्मीयांच्या धर्मांतराला प्रोत्साहन व पाठबळ दिले जाते. परंतु, साऱ्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत हिंदूंनी तेथील आपली धर्म व संस्कृती जपली आहे. हिंदूंची मंदिरे नष्ट करण्याचे प्रयत्न झाले, त्यांना सर्व प्रलोभने देऊन झाली तरीही मलेशियातील हिंदूंनी आपला धर्म, संस्कृती व आपल्या धार्मिक प्रथा जपल्या आहेत. ते दीपावली, पोंगल, नवरात्री आणि थाई पुसम सारखे सण मोठ्या उत्साहाने साजरे करतात. हिंदूंनी देशभरात ८०० हून अधिक मंदिरे बांधली आहेत.

> **शिक्षण असो वा व्यवसाय, धर्म असो वा अध्यात्म जगात सर्वत्र भारतीयांचा सकारात्मक प्रभाव पडतो आहे. जगभरातील विचारवंत, लेखक वैश्विक मूल्ये असलेल्या भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यास करीत आहेत. एवढेच नव्हे तर हिंदू जीवनशैली जगभर स्वीकारली जात आहे.**

> **परदेशातील हिंदूंनी जगभरात हजारो मंदिरे बांधली आहेत. अनेक मंदिरांमध्ये साप्ताहिक संस्कार वर्ग, अभ्यास वर्ग चालतात. अनेक ठिकाणी मुलांना विविध श्लोक, संस्कृत स्तोत्रे शिकविली जातात. एवढेच नव्हे तर भगवद् गीता, वेद, उपनिषद, रामायण, महाभारतावर आधारित ग्रंथांचा अभ्यास या वर्गांच्या माध्यमातून केला जातो.**

### थायलंडमध्ये नवरात्रोत्सव

थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये स्थित, श्री मरिअम्मन मंदिर हे थायलंडचे मुख्य तामिळ हिंदू मंदिर आहे. हे मंदिर देवी पार्वतीला समर्पित आहे. दरवर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये नवरात्रीच्या धार्मिक मिरवणुकीत ६०,००० हून अधिक तामिळ-थाई (विजातीय विवाह करणारे) हिंदू सहभागी होतात. या १० दिवसांच्या उत्सवाच्या शेवटच्या दिवशी, मंदिरासमोरील रस्ता रंगीबेरंगी पिवळ्या-फुलांचा हार आणि मेणबत्त्यांनी सजवला जातो आणि श्री मरिअम्मनची प्रतिमा मिरवणुकीत रस्त्यावरून नेली जाते सिलोम रोडचा एक भाग तर रहदारीसाठी बंद करण्यात येतो. या मिरवणुकीतील ९० टक्क्यांहून अधिक भाविक चिनी आणि थाई आहेत. १० दिवसाच्या काळात बहुतेक थाई आणि चिनी दुकाने पिवळ्या आणि भगवा ध्वजांनी सजविली जातात. एवढेच नव्हे तर संपूर्ण सणाच्या कालावधीत म्हणजे कमीत कमी १० दिवस हे चिनी व थाई दुकानदार मांसाहारी पदार्थ खातही नाहीत आणि विकतही नाहीत. थायलंडमधील अनेक विद्यापीठांमध्ये संस्कृत भाषा शिकविली जाते. एवढेच नव्हे तर थायलंडच्या राजकुमारीने तर संस्कृतमध्ये अनेक गीते रचली आहेत.

### संयुक्त अरब अमिरात आणि अरब विश्वात हिंदू धर्म

युएईमध्ये सध्या तीन मंदिरे आहेत. त्यातील दोन दुबईमध्ये आणि एक अबू धाबीमध्ये आहे. बुर दुबईतील श्रीकृष्ण मंदिर १९५८ मध्ये बांधले गेले. दुबईतील दुसरे हिंदू मंदिर जेबेल अली गावात शीख गुरुद्वाराच्या शेजारी आहे. या मंदिरात शिव, कृष्ण, गणेश आणि महालक्ष्मीसह १६ देवतांची प्राणप्रतिष्ठा केली आहे. जवळजवळ सहा कोटी दिरहम (१६ मिलियन अमेरिकन डॉलर किंवा ८१६ कोटी रुपये) खर्चून बांधलेले हे मंदिर ५ ऑक्टोबर २००२ मध्ये भाविकांच्या दर्शनार्थ खुले करण्यात आले. अबुधाबीमधील तिसऱ्या भव्य मंदिराचे, जे बीएपीएस हिंदू मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे, उद्घाटन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १४ फेब्रुवारी २०२४ मध्ये करण्यात आले. २७ एकर जागेवर सुमारे ७०० कोटी रुपये खर्चून हे मंदिर बांधण्यात आले आहे. विशेष म्हणजे मंदिरासाठी जमीन यूएई सरकारने दान केली होती.दुबईतील शीख गुरुद्वारा, गुरू नानक दरबार १०,००० हून अधिक उपासकांना सेवा देतात. २० मिलियन डॉलर खर्चून बांधलेला हा गुरुद्वारा ऑक्टोबर २०२२ मध्ये भाविकांसाठी सुरू करण्यात आला. उघडण्यात आले. येथे दर शनिवारी शनिवारी मुलांसाठी तीन तासांचे विशेष सत्र आयोजित केले जाते. मुलांना पंजाबी भाषा, कीर्तन आणि इतर धार्मिक शिक्षणही दिले जाते. अनेक स्थानिक अरब स्त्री आणि पुरुष हिंदू भजने गाताना दिसतात. संपूर्ण अरब विश्व, इराण आणि तुर्कस्तानमध्ये योग खूप लोकप्रिय आहे. तसेच 'आयुर्वेदिक बुरखा' लोकप्रिय होत आहे. तो अरबी स्त्रियांमध्ये प्रचलित त्वचेच्या आजारावर उतारा आहे.

(ऑर्गनायझरवरून साभार)

# मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान अंतर्गत विविध योजनाच्या जाणीव जागृती कार्यक्रमाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

महिला व बाल विकास विभाग अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), जिल्हा कार्यालय बीड मार्फत आज अंबाजोगाई येथे मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान अंतर्गत विविध योजनाची जाणीव जागृती कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हा महिला बाल विकास अधिकारी श्री सुधीर ढाकणे व माविम जिल्हा समन्वय अधिकारी एस बी चिंचोलीकर यांच्या मार्गदर्शना खाली झाला.यावेळी संतोष वैष्णव (संरक्षण अधिकारी), बाळकृष्ण सूर्यवंशी (कृषी अधिकारी, अंबाजोगाई), नारायण बंडे (जिल्हा व्यवस्थापक,ICICI), अंबाजोगाई CMRC अध्यक्षा रेखाताई वेडे, अंजली गायकवाड इत्यादी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी अंबाजोगाई लोक संचलित साधन केंद्र,अंबाजोगाई च्या १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा (-GM²) व महीला मेळावा आयोजित करण्यात आला होता. उपस्थित स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या महिला मोठया प्रमाणात उपस्थित होत्या. या महिलांना महिला बाल विकास विभाग व महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अंतर्गत कार्यरत योजनाची जनजागृती करून त्या योजनाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच यावेळी महिलांना बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा देण्यात आली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंबाजोगाई लोक संचलित साधन केंद्र च्या अध्यक्षा रेखा वेडे, सचिव रहेमुनिसा पठाण, व्यवस्थापक मिना कांबळे, सहयोगीनी अनिता जोगदंड, अनुराधा नरवडे, रेश्मा काशिद, विशाखा घाडगे, सुचिता सरवदे, ज्योती शिंदे, मंदाकिनी सिरसाठ, पंकज जोगदंड, खंडू डोने, स्वप्निल वाघमारे इत्यादीनी यशस्वी प्रयत्न केले.

# अधिकारी आणि गुतेदार यांच्या संगनमताने बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगारांना निकृष्ट दर्जाच्या वस्तूंचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

शासनाच्या बांधकाम कामगार कल्याणकारी मडळा अंतर्गत बीड जिल्ह्यातील नोदनिकृत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच पेटि व गृह उपयोगी वसतु भांडे यांचे वाटप गेल्या दोन महिन्यांपासून नामलगाव फाटा येथे सुरू आसले तरी अधिकारी आणि माल पुरवठा करणाऱ्या संस्थेचे गुतेदार यांच्या संगनमताने कामगारांना शासनाने ठरवुन दिलेल्या नियमाप्रमाणे सुरक्षा संच व त्यामधील वस्तू निकृष्ट दर्जाच्या वाटप करण्यात येत आहेत तर काही संचामध्ये कमी वस्तु दिसुन येत आहेत येथिल कामगारांना सांगितल्या नंतर ते आरेराविचि भाषा या बांधकाम कामगाराबरोबर केली जात आहे तसेच गृह उपयोगी वसतु भांडे संचांचे सिल चिकट पटि वाटणयापुरवि काढुण परत चिकटवलेली आसते या सर्व भृशटाचाराचि वरिष्ठ स्तरावरुन चोकशी करून समंधित दोशी वर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हा अधिकारी कामगार मंत्री व मुख्यमंत्री यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे कामगार कल्याणकारी मडळा अंतर्गत बीड जिल्ह्यातील नोंदनी कृत बांधकाम कामगारांना नामलगाव फाटा येथे सुरक्षा संच पेटि व गृह उपयोगी वसतु भांडे संचांचे वाटत सुरू आसले तरी अधिकारी आणि पुरवठा करणारे संस्थेचे गुतेदार यांच्या संगनमताने बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगारांना सुरक्षा संच पेटि व तया मधील वस्तू निकृष्ट दर्जाच्या वाटप करण्यात येत आहेत काही संचामध्ये कमी वस्तु दिसुन येते आहेत तसेच गृह उपयोगी वसतु भांडे संचांचे सिल चिकट पटि वाटणयापुरवि काढुण परत चिकटवलेली आसते या संदर्भात काही लोकांनी येथिल कर्मचारी यांना सांगितले असता ते आरेराविचि भाषा करतात या पुरवण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या वास्तूंची व पुरवठा करणाऱ्या संस्थेचे गुतेदार व समंधित अधिकारी यांची वरीष्ठ स्तरावरून चोकशी करून समंधित दोशी वर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री कामगार मंत्री व जिल्हा अधिकारी यांच्या कडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# स्वा सावरकर प्राथमिक विद्यालयात पर्यावरण पुरक गणेश मूर्ती कार्यशाळा आयोजित



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयात गणेश मूर्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेतील सहशिक्षक श्री. रविंद्र नागरगोजे सर व श्री . सचिन बारगजे सर यांनी विद्यार्थ्यांना गणेश मूर्ती कशी तयार करायची हे विद्यार्थ्यांना गणेश मूर्ती तयार करून दाखविले व तशाच प्रकारे काही विद्यार्थ्यांनी सरांच्या मार्गदर्शनाने गणेश मूर्ती तयार केली.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप जोशी सर, विभाग प्रमुख श्री. सचिन सानप सर व श्री . राजकुमार अचवले सर व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# पुस्तकांचे वाचन सोशल मीडियापेक्षा आयुष्याला दिशा देणारे ठरते -प्रा. अंकुश साबळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या महा वाचन श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात उदंड प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध साहित्यिकांच्या पुस्तकांचे वाचन केले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषा साहित्याच्या पुस्तकांचे वाचन केले.



यामध्ये पु ल देशपांडे यांचे ' व्यक्ती आणि वल्ली ', शिवाजी सावंत यांचे 'छावा ', शेक्सपियर चे ' हॅम्लेट ' या पुस्तकांमधील उतारे वाचन करण्यात आले.महावाचन उत्सव स्पर्धेत महाविद्यालयातून १)कोमल तौर, २)प्रिया हरदास आणि३) रविराज तोंडे यांनी क्रमांक पटकावले.यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे म्हणाले की, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचे माध्यम वापरताना वेळेची मर्यादा ठेवली पाहिजे. त्या माध्यमातून आपण कोणत्या गोष्टी उपयोगाच्या आहेत ते लक्षात घ्यावे.विद्यार्थ्यांना स्वतःचे करिअर घडविण्यासाठी सकारात्मक वाचनाची गरज आहे. शासनाने चालू केलेल्या उत्सवातून प्रेरित होऊन जास्तीत जास्त चांगली पुस्तके वाचावीत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. उपक्रमाचे संयोजन प्रा.प्रल्हाद तावरे, प्रा. डॉ.राजाराम जाधव, प्रा. राघवेंद्र मुळी,प्रा.परमेश्वर पवार, प्रा. स्वाती साखरे यांनी केले.

# स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयात शिक्षक दिन कार्यक्रमाचे आयोजन





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

दि.५ सप्टेंबर रोजी स्वा. सावरकर प्राथमिक विद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला.यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा . श्री. चंद्रकांत मुळे सर, विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रीय शिक्षक सदस्य श्री .उमेश जगताप, स्थानिक नियामक मंडळाचे कार्यवाह डॉ.श्री.अविनाश देशपांडे, प्रमुख वक्त्या शाळेच्या माजी शिक्षिका श्रीमती.विजयमाला जगताप , माजी शिक्षक श्री .शरद येवतेकर , शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप जोशी सर व विभाग प्रमुख श्री सचिन सानप यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री . प्रदीप जोशी सरांनी शिक्षक दिन का साजरा केला जातो व शिक्षक माणसाच्या जीवनात किती महत्त्वाचे आहे हे विद्यार्थ्यांना सांगितले. या प्रसंगी काही विद्यार्थ्यांने शिक्षक दिनानिमित्त भाषणे व भित्तीपत्रके तयार केली. प्रमुख वक्त्यांनी शिक्षकांचे कार्य हे इतर कार्यापेक्षा पवित्र कार्य असे विद्यार्थ्यांना सांगितले.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष समारोपात प्रा .श्री . चंद्रकांत मुळे सरांनी शिक्षक हा देशाचा भावी पिढी घडविणारे व्यक्ती आहे असे सांगितले व सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पद्य गायन श्री. रविंद्र नागरगोजे, सुत्रसंचलन श्री . योगेश दातीर व आभारप्रदर्शन श्रीमती.पल्लवी खंबायते यांनी केले.

# आरोग्यदायी जीवनासाठी समतोल आहार घेणे महत्वाचे-डॉ.सीमा जोशी

## सर्वांगिण विकासासाठी पोषक आहार आवश्यक-डॉ.संध्या आयस्कर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

येथील महिला कला महाविद्यालयात गृहविज्ञान विभागाद्वारा १ ते १४ सप्टेंबर या कालावधीत आंतरराष्ट्रीय पोषण पंधरवडाचा उदघाटन कार्यक्रम संपन्न झाला.या प्रसंगी अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर, उद्धाटक डॉ.सीमा जोशी व्यासपीठावर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात कुंडीत तुळशीचे रोप लावून करण्यात आली.या प्रसंगी छीींळ- ींळीी ऊळशीी ञ्ञे एींशीूपश यावर आधारित तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रस्ताविकातून गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. वर्षा कुलकर्णी यांनी आंतरराष्ट्रीय पोषण पंधरवाडा आयोजनाची भुमीका आणि या अंतर्गत घेतल्या जाणार्या उपक्रमाची माहिती दिली.



उद्धाटक डॉ. सीमा जोशी यांनी पोषण सप्ताहाचे महत्व सांगितले. आजच्या बदलत्या युगात आजही बालमृत्यु आणि मातामृत्यु प्रमाण हे चिंता वाढविणारे कसे आहे हे सद्यस्थितीतील आकडेवारीसह विषद केले.आरोग्यदायी जीवन जगण्या करिता आहारात सर्व अन्न घंटकांचा समावेश असणे गरजेचे आहे. हे सांगतांना त्यांनी दररोजच्या आहारात कॅलरीज, प्रथिने, स्निग्ध, कॅलशीयम, समृध्दयुक्त पदार्थाचा आहारात कसा समावेश करावा हे सांगीतले.

आजच्या बदलत्या जीवन शैलीमध्ये किशोरवयीन मुलींमध्ये स्थुलतेचे प्रमाण वाढलेले दिसुन येत आहे. याचे कारण म्हणजे समतोल आहार न घेणे. व्यायामाचा आभाव. मोबाईलचा अतिवापर, जंकफुड सेवन त्यामुळे हे सर्व टाळण्यासाठी दररोज व्यायाम करा, पौष्टीक अन्न घ्या, कडधान्ये, दुध, अंडी, गुड, शेंगदाणे, पालेभाज्या, फळे यांचे सेवन करा आणि आरोग्यदायी जीवन जगा असा सल्ला दिला.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी आंतरराष्ट्रीय पोषण पंधरवाड्याचे महत्व सांगितले. मानवी जीवनचक्राच्या प्रत्येक अवस्थेत पोषण कसे महत्वाचे आहे हे सांगताना प्रत्येक अवस्था शास्त्रीय परिभाषेत विषद करुन यात पोषक युक्त आहार कसा घ्यावा या बद्दल प्रतिपादन केले. प्रत्येकाने आरोग्यदायी आणि निरोगी जीवन जगण्यासाठी पोषक आहार घ्यावा असे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.वर्षा कुलकर्णी यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील विद्याथीनी, सहा. प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार ऐश्वर्या पवार, बी.ए.तृतीय वर्षाच्या विद्यार्थीने केले.



स्वा सावरकर प्राथमिक विद्यालयात सखी सावित्री समितीची पहिली बैठक आयोजित करण्यात आली.यावेळी समितीचे अध्यक्ष म्हणून एस एन कुलकर्णी सर ,सचिव मुख्याध्यापक प्रदीप जोशी सर ,वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ डॉ.सौ सीमाताई जोशी , एडवोकेट संगिता अनिल धसे ,अंगणवाडी सेविका श्रीमती सुवर्णमाला मारोती जोशी ,नगरपरिषद महिला प्रतिनिधी श्रीमती सविता राजेंद्र काळे ,महिला शिक्षक प्रतिनिधी श्रीमती पल्लवी खंबायते ,माता पालक प्रतिनिधी श्रीमती शीतल प्रमोद शहाणे अशा प्रकारे समिती नेमण्यात आली .यावेळी विद्यार्थिनी सुरक्षा व सखी सावित्री समिती उद्देश व कार्य याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी सूत्रसंचालन श्रीमती चाटोरीकर ताई यांनी केले .बैठकीची सांगता कल्याणमंत्राने करण्यात आली .

# जिल्हा प्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत करावी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

जिल्ह्यात सर्वत्रच दोन दिवस मुसळधार पावसाने थैमान घातले असल्याने लाखो शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. सोयाबिन, तूर, मुग, उडीद, कापूस इत्यादी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच शहरासह ग्रामीण भागातील अनेक लोकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांची घरे पडली असून संसार उघड्यावर आला आहे. काहींच्या दुकानात आणि घरात पाणी शिरल्याने अनेक मौल्यवान वस्तू खराब झाल्या आहेत. तसेच अनेक ठिकाणी मूकी जनावरे वाहून गेली आहेत. उभी पिके वाहून गेली असल्याने हाता तोंडाला आलेला घास हिरावला गेला आहे. जमिनी खरडून गेल्याने पावसाचा मोठा फटका बसला आहे. तसेच अनेक ठिकाणी दोन गावांना जोडणारा नदी नाल्यावरील पूल वाहून गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. जिल्हाप्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत करावी असे आवाहान शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकारी यांना पत्रकाद्वारे केले आहे.

**अनिलदादा जगताप यांच्या सूचना**



याबरोबरच बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे भूस्खलनाचा होण्याचा धोका आहे. सदरील गावात ८० ते ८५ कुटुंबे असून ५०० ते ६०० लोक सध्या त्याठिकाणी वास्तव्यास आहेत. या गावाची रचना, वरच्या बाजूला डोंगर व खालच्या बाजूला नदी आणि मधोमध गाव अशाप्रकारची आहे. त्यामुळे तेथे भूस्खलन होण्याचा धोका सातत्याने जाणवत आहे. या गावातील लोकांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने या गावाचे पुनवर्सन करण्यात यावे .

तसेच बीड शहरानजीक असलेले बिंदुसरा धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहत असल्याने बीड शहरातील नदीकाठच्या नागरिकांना, व्यापाऱ्यांना नगरपालिकेच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. याबाबत देखील जिल्हा प्रशासनाने उपयोजना कराव्यात. शहरातील अनेक भागांमध्ये स्वच्छतेअभावी नागरिकांच्या राहत्या घरामध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून दैनंदिन जीवन, आरोग्य तसेच इतर प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. याबाबत नगरपालिकेच्या वतीने नाली स्वच्छता करून नागरिकांना रस्ते व सोयीसुविधा देण्यासाठी यंत्रणेला आदेशित करावे अशा विविध सूचना शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत आदिवासी समाजाचा जिल्हा कचेरीवर उलगुलान मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार १२ हजार ५०० अधिसंख्य ठरलेल्या पदावरील बोगस आदिवासी कर्मचारी यांना तत्काळ सेवामुक्त करून सदरील पदे आणि ५५ हजार ६८७ अनुशेषाची रिक्तपदे विशेष पदभरती करण्यात यावी या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांसाठी मुळ आदिवासी समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला.

येथील छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पूतळ्यापासून गुरूवारी माजी आ. डॉ संतोष टारफे यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील आदिवासी बांधव, भगिनींनी भव्य मोर्चा काढला. या मोर्चात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. या मोर्चाचे आयोजन आदिवासी युवक कल्याण संघाच्यावतीने करण्यात आले होते. शहरातील प्रमुख मार्गावरून हा मोर्चा काढण्यात आला. आदिवासी समाजाचे खोटे जात प्रमाणपत्र काढणारे द्ऱ्याखोऱ्यातील मुळ आदिवासी समाजाचे आरक्षणामध्ये घुसखोरी करीत आहेत. परिणामी मुळ आदिवासी समाजावर अन्याय होत आहे. शासनाने आदिवासी विशेष पदभरती व अनुसुचीत जमाती रिक्त जागेचा अनुशेष अद्याप भरला नाही. त्याविरोधात आदिवासी समाजाने मोर्चा काढला होता. आदिवासी समाजाचा भव्य मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्यानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनाला निवेदन सादर केले. या निवेदनात एमपीएससी वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ ची पदे भरतांना पूर्व परिक्षांचे अर्जात जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य करावे, शासकीय सेवेतील पदभरतीमध्ये अनुसुचीत जमातीतील संवर्गाच्या कोट्यातुन निवड झालेल्या कर्मचाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करावे, जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर नियुक्ती देऊ नये, अनुसूचीत जमातीच्या संवर्गाच्या सर्व पदांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पदोन्नती आरक्षण पूर्ववत सुरू करावे, राजेंद्र भारूड यांच्यावरील गुन्हा मागे घेण्यात यावा, अनुसूचीत जमातीच्या उमेदवारांना पेसा भरतीत संधी द्यावी, पेसा भरती तत्काळ सुरू करावी, पीएचडी धारक विद्यार्थ्यांना केंद्राच्या धर्तीवर फेलोशीप लागू करावी, अनुसूचीत जात पडताळणी समिती कार्यालय किनवट हे संभाजीनगर येथून स्थलांतरीत करून किनवट किंवा कळमनुरी येथे चालू करावी, आदिवासी युवक-युवतींना शबरी विकास महामंडळामार्फत ५ लक्ष रूपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून द्यावे, अनुसूचीत जमातीच्या यादीत कोणत्याही जातींना समाविष्ट करण्यात येवू नये, अनुसूचीत जमाती राज्य आयोग तत्काळ कार्यान्वीत करावा, जात पडताळणी कायदा २००० अंमलबजावणी प्रभावीपणे करावी, शबरी घरकुल योजनेसाठी ३ लाख रूपये अनुदान द्यावे आदी मागण्यांचा समावेश आहे. यावेळी शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी माजी आ. डॉ संतोष टारफे, आदिवासी युवक कल्याण संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपूते, संजय काळे, बबन डुकरे, मारोती बेले, काळुराम कुरूडे, माधव घोगरे आदींची उपस्थिती होती.

# सांदीपनी पब्लीक स्कूलचे जलतरण, जिम्नॅस्टीक स्पर्धेत यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड. व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि. ०३ सप्टेंबर २४ रोजी कै. शांताराम सगणे जलतरणीका, गोकुळ नगर येथे जिल्हास्तरीय जलतरण क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत स्थानिक सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु) नांदेड. येथील १४ वर्ष वयोगटात शुभम तुळशीराम कडेकर, प्रथमेश चंद्रकांत हामदे, विभव सचिन जाधव, संचित संदीप चौधरी यांनी फ्री स्टाईल रिले ४ बाय १०० जलतरण सांघिक खेळामध्ये प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक पटकाविलेले असून त्याची विभागीय जलतरण क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. तसेच फ्री स्टाईल १०० मीटरमध्ये शुभम तुळशीराम कडेकर प्रथम आणि प्रथमेश चंद्रकांत हामदे द्वितीय क्रमांकाचे पारितोषक मिळविले तसेच दि. ३० ते ३१ ऑगस्ट दरम्यान किरण स्पोर्ट्स दीपक नगर नांदेड येथे जिल्हास्तरीय जिमनॅस्टिक क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या क्रीडा स्पर्धेत १७ वर्ष मुले वयोगटात सक्षम विषय रणवीर आणि १४ वर्षे मुले वयोगटामध्ये अर्थव गजानन कांबळे आणि मुलीमध्ये रक्षिता रविकुमार बकवाड हिने आरटीस्टिक जिमनॅस्टिक क्रीडा स्पर्धे मध्ये प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक पटकाविले आहे. या सर्व खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड झाली आहे. या उज्वल यशाबद्दल व पुढील स्पर्धेसाठी शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, शाळेचे प्रशासक मारुती मेखाले क्रीडा शिक्षक भाऊराव राठोड तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# बेकायदेशीर पिस्टल बाळगणाऱ्या आरोपीला अटक, गावठी बनावटी पिस्टलसह ४ जीवंत काडतूस जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**

शहरातील महादेववाडी येथे एका इसमाकडे बेकायदेशीर पिस्टल असल्याची माहीती पोलिसांना मिळाल्यानंतर पथकाने आरोपीकडून एक गावठी पिस्टल तसेच ४ जीवंत काडतुस जप्त केले असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या आदेशान्वये जिल्ह्यातील अवैध धंदे तसेच बेकायदेशीररित्या शस्त्र बाळगणाऱ्याविरूध्द कार्यवाहीची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथके तयार करण्यात आले असून गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. दि ४ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून पोउपनि विक्रम विठुबोने यांच्या पथकाने शहरातील महादेववाडी परिसरात राहणाऱ्या अमन प्रकाश घुगे हा बेकायदेशीरित्या गावठी पिस्टल बाळगत असल्याची माहीती मिळाल्यावरून पोलिसांनी तपास केला असता त्याच्याकडे एक लोखंडी गावठी पिस्टल आणि ४ जीवंत काडतूस आढळून आले. पोलिसांनी सदर मुद्देमाल जप्त केला असून आरोपीला अटक केली आहे. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोनि विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विक्रम विठुबोने, प्रेमदास चव्हाण, लिंबाजी वाव्हळे, किशोर सावंत, विशाल खंडागळे, महादु शिंदे, प्रशांत वाघमारे यांनी केली आहे.

# आ. नवघरेंची घेतली कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट, तातडीने मदत करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ५ सप्टेंबर**



वसमत विधानसभा क्षेत्रात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आतोनात नुकसान झाले तसेच शहरातील व्यापारी, नागरिक यांच्या दुकाने, घरात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त भागाचे तत्काळ पंचनामे करून शेतकरी आणि पुरग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी आ. राजु नवघरे यांनी प्रत्यक्ष कृषीमंत्री धनंजय मुंढे यांची भेट घेत केली. हिंगोली जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या व्यापक व गंभीर नुकसानीच्या संदर्भात चर्चा केली. या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. पिकांचे, कृषी व अन्य संसाधनांचे पंचनामे सविस्तरपणे करून, या नुकसानीचा संपूर्ण आढावा घेऊन, शेतकऱ्यांना आवश्यक असलेली आर्थिक मदत त्वरित उपलब्ध करावी, तसेच संपूर्ण जिल्हा ओला दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करावा, यासाठी निवेदन सादर केले आहे. यावेळी या परिस्थितीचा गंभीरपणे विचार करून शेतकऱ्यांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी तातडीने व प्रभावी उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली.

# खरबी वळण बंधारा विरोधात सिंचन संघर्ष समितीचा सोमवारी ट्रॅक्टर मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**

कयाधू नदीवर खरबी येथे बंधारा उभरून येथून ईसापुर धरणामध्ये पाणी वळविण्याच्या संदर्भात निविदा प्रकाशित झाल्यानंतर आज हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहावर या संदर्भात सिंचन संघर्ष समितीची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये उपस्थित असलेल्या सर्वपक्षीय नेत्यांनी शासनाने खरबी येथील बंधारा तात्काळ रद्द करावा असा ठराव घेऊन त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. तसेच सोमवार दिनांक ९ सप्टेंबर रोजी हिंगोली येथे भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

सिंचन संघर्ष समितीच्यावतीने मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की दिनांक ३ सप्टेंबर रोजी उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक चार आखाडा बाळापूर च्या कार्यकारी अभियंत्यां खरबी वळण बंधारा, खरबी ते ईसापूर जलाशय पाणी वाहन प्रणालीचे बांधकाम व अनुषंगिक कामे या नावाने निविदा प्रकाशित करण्यात आलेली असून याकरता ९९५ कोटी ४१ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे ४ सप्टेंबर पासून १८ सप्टेंबर पर्यंत निविदा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत २० सप्टेंबर रोजी निविदा उघडण्यात येणार असल्याचे सदर निविदा सूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे .



हिंगोली जिल्ह्यातील एकमेव जिवंत नदी व हिंगोली जिल्ह्याची भाग्यरेषा असलेल्या कयाधू नदीवर हिंगोली तालुक्यातील खरबी येथे बांधारा बांधून ते पाणी ईसापुर धरणात वळवून नांदेडला पळविण्यासाठी दिनांक ३ सप्टेंबर रोजी या कामाच्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत सदरचा खरबी बंधारा बांधल्यास हिंगोली जिल्ह्याचे अक्षरशः वाळवंट होणार आहे कयाधू काठच्या परिसरातील गावांचे शेतकऱ्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. हिंगोली जिल्ह्याचा सिंचनाचा अनुशेष अजूनही कायम असताना हे पाणी ईसापुर धरणात वळवून नांदेडला नेल्या जात आहे ज्यामुळे या जिल्ह्याच्या हक्काचे पाणी या जिल्ह्याला मिळणार नाही त्यामुळे हा बांधारा या जिल्ह्याच्या कोणत्याही कामाचा नसल्याने तो बांधण्यात येऊ नये. खरबी बांधारा बघण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार केला गेला आहे तो प्रस्ताव तयार करण्यापूर्वी हिंगोली जिल्ह्यातील कोणत्याही लोकप्रतिनिधी किंवा या क्षेत्रात काम करणाऱ्या कोणत्याही शेतकरी नागरिकांना विश्वासात घेतल्या गेले नाही वास्तविक पाहता नदी वळवणारा हा प्रकल्प असल्यामुळे याची जन सुनावणी घेणे आवश्यक असतांना संबधीत विभागाने असे काही न करता निविदा काढलेल्या आहेत बंधाराच्या बांधण्याच्या नावाखाली सापळी धरणामध्ये जेवढे पाणी येणार होते ते सर्व पाणी वळवल्या जात आहे. पर्यावरणीय दृष्ट्या नदीचा प्रवाह बदलणे याकरता केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाची पण परवानगी लागत असते परंतु एक नदीच वळती करत असताना संबंधित विभागाने अशी कोणताही परवानगी घेतलेली नाही. तसेच खरबी गावाजवळ कयाधू नदीवर बांधलेल्या बंधाऱ्यातून ईसापुर धरणात जाणारे पाणी हे बोगदा व पाईपलाईन द्वारे जाणार असल्यामुळे त्याचा फायदा ज्या भागातून हे पाणी वळवल्या जाणार आहे त्या भागातील शेतकऱ्यांना पण होणार नाही.

निविदा तात्काळ रद्द करून या प्रकल्पाला स्थगिती देण्यात यावी नसता हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी, नागरिक हा प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत होउ देणार नाहीत याकरता दिनांक ९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य ट्रॅक्टर मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी सिंचन संघर्ष समितीचे अध्यक्ष शिवाजी माने, सचिव नंदकिशोर तोष्णीवाल, आ. तानाजी मुटकुळे, फुलाजी शिंदे, माजी आ गजानन घुगे, रामदास पाटील सुमठणकर, दिलीप चव्हाण, विनायकराव भिसे, श्यामराव जगताप, शेख नईम शेख लाल, माधव कोरडे, ॲड जाधव, संजय कावडे, सुरेश आप्पा सराफ यांच्यासह मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### तेलगाव येथे देवीची मूर्ती, कळस स्थापना



वसमत- तालुक्यातील तेलगाव येथे यमुना मायची मूर्ती स्थापना व कळस स्थापना मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आला या कार्यक्रमाला तालुक्यातील शिष्यमंडळी व भक्तमंडळी मोठ्या संख्येने तेलगाव नगरीमध्ये आले होते. सकाळी विधीवत प्राणप्रतिष्ठा व पूजा आरती करून देवीची मूर्ती स्थापना करण्यात आली. मंदिराचा कळस देखील बसवण्यात आला. यावेळी गावकऱ्यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. देवीची तेलगाव नगरीमध्ये भव्यदिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली होती. वसमत तालुक्यातील हजारोंच्या संख्येने महिला व भक्त या महाप्रसादाचा व कळस स्थापनेचा मूर्ती प्रतिष्ठेचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने तेलगाव नगरीमध्ये आले होते. यावेळी गावातील ईश्वर कानोडे, गुलाब कानोडे, बापूराव राऊत, फौजी आबा रामराव राऊत, दत्ता कानडे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जलालदाभा येथे अवैध देशी दारू विक्रेत्यावर पोलिसांची धाड



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ५ सप्टेंबर**

तालुक्यातील जलालदाभा येथे अवैध देशी दारू विक्री होत असून त्यामध्ये देशी दारूचा मोठा साठा असल्याची गुप्त माहितीवरून औंढा पोलिसांना मिळाल्यानंतर पथकाने धाड टाकून अवैध देशी दारू जप्त केली आहे.

पोलिस निरीक्षक जी एस राहिरे यांनी पथकासह मौजे जलालदाभा येथे कार्यवाही केली असता मौजे जलाल दाभा ते पिंपळदरी मार्गावर एका पत्र्याच्या टिन शेडमध्ये अवैध देशी दारू विक्री करीत असताना आरोपी बालाजी बाबाराव शिंदे हा स्वतःच्या फायद्यासाठी अवैध देशी दारूच्या साठ्यासह विक्री करीत असताना मिळून आला यावरून पोलीस पथकाने विशेष कार्यवाही करत त्यास १० दारूच्या बॉक्स सह ताब्यात घेण्यात आले तर आरोपीला विचारपूस केली असता त्याने सदर माल हा सुनील मोहिते राहणार संतुक पिंपरी याने आपल्याकडे विक्रीसाठी आणून दिल्याची माहिती दिली याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांच्या सह सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पोटे एएसआय खद्दुस, जमादार मोहम्मद शेख, पटवे, हरकळ, गिरी, जमादार सिद्दिकी, कोकरे, रांजणेकर, चव्हाण यांनी केली पुढील तपास एएसआय खुद्दुस हे करीत आहेत.

# दिव्यांगांना सीएसआर योजनेंतर्गत सहायक उपकरणांचे मोफत वाटप




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील दिव्यांगांना सी. एस. आर योजने अंतर्गत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा रुग्णालय हिंगोली परिसरात सहाय्यक उपकरणांचे मोफत वाटप करण्यात आले.

या शिबिराच्या उद्घाटक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी जिल्हाधिकारी अभिनव गोयल तर प्रमुख पाहुणे म्हणून समाज कल्याण अधिकारी.राजीव येडके, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.नितीन तडस कमलेश यादव, किरण पावरा आदींची उपस्थिती होती. यावेळी दिव्यांगांना मोफत सहायक उपकरणांचे वाटप मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलास वाकडीकर यांनी केले. सूत्र संचालन दिपक गडदे यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शेख कलीम, श्रीकांत कऱ्हाळे, किसन मुटकुळे, रंगनाथ मुटकुळे यांनी परिश्रम घेतले.

# अधिकारी दोन शिफ्टमध्ये तर कर्मचारी सोळा तास 'ऑन ड्युटी'

## विमानतळ सुरक्षा पथकातील अधिकाऱ्यांच्या कारभाराकडे जिल्हा पोलीस अधीक्षकांचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०५ सप्टेंबर-**

विमानतळ सुरक्षा पथकात मंजूर संख्याबळापेक्षा केवळ ३५ पोलीस कर्मचारी कार्यरत असून यामुळे कर्मचाऱ्यांना १५ ते १६ तास कर्तव्य बजवावे लागत आहे. त्यातच येथील अधिकाऱ्यांनी आपला मनमानी कारभार सुरू केला असून अधिकारी दोन शिफ्ट मध्ये कर्तव्यावर तर कर्मचाऱ्यांना पंधरा ते सोळा तास कर्तव्यावर जुंपण्यात येत असल्याने कर्मचारी नाराजी व्यक्त करीत आहेत.

विमानतळ सुरक्षा पथकात एकूण ५७ संख्या बळ मंजूर आहे. परंतु या ठिकाणी केवळ ३५ कर्मचारी कार्यरत आहेत. विमानतळ परिसर मोठा असल्याने या ठिकाणी चेक पोस्टवर पोलिस अमलदारांना नेमण्यात येते. परंतु त्या चेक पोस्टवर कुठल्याच प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. अनेक वेळा विमान सेवेला विलंब होतो, काही वेळा टेक्निकल प्रॉब्लेम येतात तर काही वेळा व्हीआयपी तथा व्हीव्हीआयपी यांचा दौरा असल्यामुळे कर्मचाऱ्यांना भर उन्हात, पावसात, दिवस-रात्र कर्तव्य बजवावे लागत आहे. विशेष म्हणजे या परिसरात सापांचा सुळसुळाट असल्याने एखादी दुर्देवी घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यातच येथील अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू असून कर्मचाऱ्यांना १५ ते १६ तास कर्तव्याला जुंपून येथील अधिकारी दोन शिफ्ट मध्ये कर्तव्य बजावत आहेत. आगामी काळात विधानसभा निवडणुका असल्यामुळे या ठिकाणी कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याची गरज असल्याची मागणी होत आहे.

**आठ वर्षापासून महिला अधिकारी ठाण मांडून**

दरम्यान निवडणूक आयोगाने बदलीचे आदेश दिलेले असताना सुद्धा विमानतळ सुरक्षा पथकातील महिला अधिकारी मागील आठ वर्षापासून याच ठिकाणी ठाण मांडून आहेत. पोलीस उपनिरीक्षक ते सहाय्यक पोलीस निरीक्षक या पदावर पदोन्नती झाल्यानंतरही याच ठिकाणी कर्तव्यावर आहेत. विशेष म्हणजे या अधिकाऱ्यांनी स्क्रिनींग मशीनचे केवळ पंधरा दिवसाचे बेसिक ट्रेनिंग केल्याची माहिती आहे. त्यानंतर असणारे प्रशिक्षण घेतलेले नाही. यापूर्वी या महिला अधिकाऱ्यांची दोन ते तीन वेळा बदली झाली होती. परंतु त्यांनी बदली रद्द करून घेत याच ठिकाणी ठाण मांडले आहे. त्यातच या ठिकाणी असलेल्या असलेल्या कर्मचाऱ्यांना देखील या महिला अधिकाऱ्यांकडुन मानसिक त्रास देखील देण्यात येत असुन मागील सहा ते सात महिण्यापुर्वी या ठिकाणी कार्यरत एका कर्मचाऱ्याने आत्मदहन करण्याचा इशारा दिला असल्याची विश्वसनीय माहिती आहे.



## गोदावरी नदीपात्रात उडी घेतलेल्याचे वाचविले प्राण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०५ सप्टेंबर-**

गोवर्धन घाट पुलावरुन गोदावरी नदीपात्रात उडी घेतलेल्या एकाचे रुग्ण हक्क संरक्षण समितीचे मराठवाडा उपाध्यक्ष बलजितसिंघ बावरी यांनी जीवरक्षक दलाच्या मदतीने प्राण वाचविले.

शहरातील गोवर्धनघाट पुलावरुन आज दुपारी दोनच्या सुमारास कंधार तालुक्यातील हाळदा येथील पांडूरंग विठ्ठल सुसटेवाड यांनी गोदावरी नदीपात्रात उडी घेतली. पूर सदृष्य परिस्थितीमुळे जीवरक्षक दल गोदावरी नदी पात्रात तैनात असल्याने जीवरक्षक दलाच्या जवानांनी तातडीने पांडूरंग सुसटेवाड यांना बाहेर काढले. यावेळी याठिकाणी असलेल्या रुग्ण संरक्षण समितीचे मराठवाडा उपाध्यक्ष बलजितसिंघ बावरी यांनी तातडीने जीवरक्षक दलाच्या मदतीने पांडूरंग सुसटेवाड यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. वेळीच उपचार झाल्याने सुसटेवाड यांचे प्राण वाचले. या घटनेची माहिती हाळदा येथील सरपंच यांना देखील देण्यात आली.

## संक्षिप्त वृत्त

### वैद्यकीय प्रवेश परीक्षेत एम.के. टी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नो सायन्सच्या विद्यार्थ्यांचे यश

**किनवट** -मनामध्ये जिद्द असेल तर कुठलेही कार्य कठीण नाही,अशाच प्रकारची प्रचिती नुकत्याच लागलेल्या नीट वैद्यकीय पात्रता परीक्षेच्या पहिल्या प्रवेश यादीतील निकालावरून स्पष्ट होते. योग्य मार्गदर्शन व सातत्यपूर्ण अभ्यास यांच्या बळावरती किनवट सारख्या आदिवासी, दुर्गम भागांमध्ये २ दोन वर्षांपूर्वी कार्यरत झालेल्या मातोश्री कमलताई ठमके इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नो सायन्स, गोकुंदा(ता. किनवट)मधील विद्यार्थ्यांची पहिल्या यादीत निवड होणे हे स्पष्ट करते,असे प्रतिपादन अभि. प्रशांत ठमके यांनी केले. महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सभागृहात विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालया मध्ये निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्या शुभांगीताई ठमके, माजी प्राचार्य राजाराम वाघमारे, मुख्याध्यापक तथा प्राचार्य अंबादास जुनगरे व रामराव घुले हे उपस्थित होते. एम.के.टी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नो सायन्स चे विद्यार्थी सुयश प्रशांत ठमके यांने नीट परीक्षेत ५९५ एवढे गुण घेऊन राजीव गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,ठाणे ,तर यश रामराव घुले यांने ५७७ एवढे गुण प्राप्त करून शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे पहिल्याच प्रयत्नात प्रवेश मिळवला असल्यामुळे यशस्वी विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह सत्कार करण्यात आला. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळावा म्हणून अनेक विद्यार्थी नांदेड सारख्या जिल्ह्याचे ठिकाणी राहून लाखो रुपये खर्च करून डॉक्टर बनवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटत असतात. परंतु, आपले हे स्वप्न किनवट सारख्या भागामध्ये राहून सुद्धा पूर्ण होऊ शकत. ही बाब मातोश्री कमलताई ठमके इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नो सायन्स या संस्थेने सिद्ध करून दाखवली आहे. २५ विद्यार्थ्यांच्या पहिल्या बॅचमधील २ विद्यार्थ्यांची निवड होणे हे निश्चितपणे भविष्यातील सुंदर यशाची नांदी आहे. हे यावरून स्पष्ट होते. इन्स्टिट्यूट मधील तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन, अद्यावत ज्ञान, सुसज्ज अभ्यासिका यामुळे हे शक्य झाले असे, मत गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.फैयाज आलम,प्रा.नैहाल अहमद,प्रा.शेख शब्बीर प्रा.सुघोष चव्हाण, उप मुख्याध्यापक प्रमोद मुनेश्वर, पर्यवेक्षक प्रा.इंगळे आर.व्ही, किशोर डांगे, सुभाष सूर्यवंशी, चव्हाण पी.पी.यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास नीट व जेईई या परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी,पालक, परिसरातील नागरिक, प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,हे मोठ्या संख्येने उपस्थित होते,सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संतोष बैस ठाकूर यांनी केले तर आभार प्रा.सुबोध सर्पे यांनी मानले.

### सिडको क्षेत्रीय कार्यालयातील तीन कर्मचाऱ्यांस पदोन्नती

**नवीन नांदेड** -नांदेड वाघाळा शहर महापालिकेच्या आकृतीबंध शासन निर्णय दिनांक २०२३ अन्वये मंजूर झाल्यानुसार नांदेड मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ४ वाजता निवड समितीची बैठक आयोजित करून मनपातील विविध मुळपदावरील कर्मचाऱ्यांस पदोन्नती देण्यात आली. सिडको क्षेत्रिय कार्यालय येथील तीन कर्मचारी सौ. मीना अजायबसिंग अडबलवार या लिपिक पदावरून वरिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती तर मारोती शंकरराव सारंग व मदन ज्ञानोबा कोल्हे हे दोघे ही मूळ माळी पदावरून लिपिक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. नांदेड वाघाळा शहर महापालिकेच्या आकृतीबंध शासन निर्णय दिनांक २०२३ अन्वये मंजूर झाले या मनपाच्या आस्थापनेवरील चतुर्थ श्रेणी गट -ड मध्ये कार्यरत सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम २०२४ मंजूर झाल्याने नांदेड मनपा सेवा प्रवेश नियमानुसार विहित अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णयानुसार रिक्त पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात मनपा आयुक्त डॉ. ्महेश कुमार डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ४ वाजता निवड समितीची बैठक आयोजित करून सदरील निवड समितीने संदर्भ क्रमांक ३ अन्वये खालील प्रमाणे पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे. संदर्भ क्रमांक ३ अन्वये निवड समितीने शिफारस केल्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापना श्रेणी गट- ड मधील पदावर कार्यरत असलेल्या व सेवा प्रवेश नियमानुसार विविध अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा जेष्ठता विहीत अर्हता व पात्रतेनुसार आस्थापनेवरील गट- क मधील लिपिक टंकलेखन या पदावर वेतनश्रेणीच्या अटी शर्तीच्या अधीन राहून नियमित पदोन्नती देण्यात आली आहे. सदरील पदोन्नतीसाठी सिडको क्षेत्रिय कार्यालय येथील तीन कर्मचारी सौ. मीना अजायबसिंग अडबलवार या लिपिक पदावरून वरिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती तर मारोती शंकरराव सारंग व मदन ज्ञानोबा कोल्हे हे दोघे ही मूळ माळी पदावरून लिपिक पदावर पदोन्नती देण्यात आली. आहे.सदरील पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांचे सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी संभाजी कास्टेवाड यांनी अभिनंदन केले.

### अतिवृष्टीची नुकसान भरपाई द्या :कलंबरकर

**मुखेड** - मागील ५० तासापेक्षा अधिक कालावधीपासून मराठवाड्यात नांदेड व मुखेड तालुक्यात सारखा पाऊस पडल्याने असल्याने अतिवृष्टीची नोंद झाली आहे.अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले होते,पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.तरी प्रशासनाने बाऱ्हाळी,मुक्रामाबाद,जांब व अंबुलगा महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद जाहीर केली आणि जाहूर,येवती,चांडोळा आणि मुखेड महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद दिली नाही.अतिवृष्टीने संपूर्ण मुखेड तालुक्यात पिकांचे नुकसान झाले आहे.संपूर्ण मुखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांची नुकसानभरपाई मिळाली पाहिजे अशी मागणी सरकार व प्रशासनाकडे प्रत्यक्ष बाधित पिकांच्या शेतीतून शेतकरी संघटनेचे शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी केले आहे. मागील वर्षी अतिवृष्टी व ढगफुटीने पिकांचे नुकसान व जमीन खरडून गेली होती.त्याची नुकसान भरपाई अजून बऱ्याच शेतकऱ्यांना मिळाली नाही.त्यांना ती तात्काळ मिळावी.गेले वर्षी प्रशासनाने पंचनामे करतांना प्रत्यक्ष नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मधून वगळले होते,तसे प्रकार यावर्षी होऊ नयेत याची दखल तहसीलदार साहेबांनी घ्यावी असे मागणीत सांगितले आहे.

## 'नो डिजे नो डॉल्बी' सामाजिक बांधीलकी जोपासुनच गणेशोत्सव साजरा करावा : पो.नि. अंकुश माने



**तभा वृत्तसेवा**
**उमरी, ०५ सप्टेंबर-**

उमरी शहर व तालुक्यातील गणेश मंडळांनी सामाजिक विविध उपक्रमाचे देखावे करून 'नो डिजे नो डॉल्बी' या प्रमाणे सामाजिक बांधीलकी ठेवून गुलाल मुक्त फुलाची उधळन करून गणेश उत्सव साजरा करावे असे अव्हान ही उमरी पोलिस निरीक्षक अंकूश माने यांनी शांतता कमीटीच्या बैठकीत केले आहे .

उमरी पोलिस ठाणेच्या वतिने मान्यवराचे स्वागत करण्यात आले विशेष मुस्लीम सामाजीक कार्यकर्ते सय्यद चाँदसाब यांच्या वतिने ही मान्यवराचे स्वागत करण्यात आले.

या शांतता कमिटीचे अध्यक्ष पोलिस निरीक्षक अंकुश माने हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यधिकारी निलम कांबळे , पोलीस उपनिरीक्षक मराळे , जिल्हा मध्यर्ती बँक संचालक कैलास देशमुख गोरठेकर , रेल्वे बोर्ड सदस्य पारस दर्डा , शिवसेना शिंदे गट अध्यक्ष सुभाष पेरेवार , माजी नगरसेवक एजाज खॉन , माजी नगरसेवक किशान रॅपनवाड सर , गंगाधर सवई , विद्यूत विभागाचे बी एस तोटावाड , कॉग्रेस तालुकाध्यक्ष प्रल्हाद पा इज्जतगावकर , भाजपाचे गजानन मालीपाटील , नगरसेवक प्र सोनू वाघमारे , मज्जीद कमीटीचे प्रमुख जावेदखॉन, नगसेविका अनुसयाबाई कटकदवणे ,तलाठी खानसोळे , दिगांबर जगताप , एम आय एमचे तालुध्यक्ष , यांची उपस्थिती होती.

पुढे पोलिस निरीक्षक अंकुश माने म्हणाले की हिंदू - मुस्लीम ऐक्यची परंपरा ही अशीच कायम राहावी शक्तो एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवावी गणेश मंडळानी डिजे च्या भानगडीत पडू नये समाजापुढे विविध देखावे करून समाजापुढे आदर्श ठेवावा गुलाल ही केमिकल युक्त बाजारात येत आहे त्यामुळे त्वचेला डोळ्यावर परिणाम पडतो गुलाल त्या ऐवजी फुलाची उधळ केल्यास शेतकरी फुल वाल्याची खरेदी झाल्यास त्यांना ही चार पैसाची मदत होईल . गणेश मुर्तीची जागरण म्हणून पत्ते खेळू नये अवैध धंदे ताटू नये तसे निदर्शनास आल्यावर संबधीत मंडळावर योग्य ती कडक कारवाई करण्यात येईल यात कोणाचाही हायगय केली जाणार नाही विद्रुप गाणे लावून हा उत्सव साजरा करू नका धार्मिकच गाणे लावा गणपती उत्सवाला गालबोट लागेल असे वर्तन करू नका तशी मंडळानी ही खबरदारी घ्यावी कायद्याचे पालन करा गणेश मंडळाचा एक चांगला संदेश समाजापर्यंत पोहचेल अशी शिस्तबद्ध ठेवा असेही पो नि अकुंश माने यांनी मार्गदर्शन केले आहे

मुख्यधिकारी निलम कांबळे ही म्हणाल्या, नगर परिषद प्रशासन सदैव तुमच्या सेवेत असेल कांही समस्या उद्धभल्यास आमच्याशी संपर्क करावे गणपती समोर स्वच्छता राखावी तसे नगरपरिषद स्वच्छता अभियान सुरू ठेवणार आहे शक्यतो इकोविल गणपती बसवावे म्हणजे मातीचे असले तर खुप चांगल होईल नगर परिषदेकडून कोणतीच अडचण भासू दिली जाणार नाही असे मुख्यधिकारी निलम कांबळे यांनी गव्हाई दिली आहे.

कार्यक्रमाचे सुरेख असे सुत्रसंचालन छावाचे जिल्हा संघटक राजेश जाधव यांनी केले व आभार मानले. या बैठकीला तालुक्यातील सर्व पोलिस पाटील, प्रतिष्टीत नागरीक , सर्व पक्षाचे पदअधिकारी पत्रकार बांधव सामाजीक कार्यकर्ते गणेश मंडळाचे पदाधिकारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## दुरूस्तीवर लाखो रूपय खर्च करूनही वारंवार विद्युत पुरवठा खंडीत

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, ०३ सप्टेंबर-**

दरवर्षी महावितरणकडून दुरूस्तीवर लाखो रूपय खर्च करून ही वारंवार विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याने नागरिक चांगलेच वैतागले आहेत. गेली पंधरा दिवसापासून अचानक विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढल्याने अनेक छोट्या मोठ्या व्यवसायिकांना याचा फटका बसत आहे.

नायगांव शहरासह तालुक्यातील विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढत असुन . दरवर्षी महावितरणकडून खाजगी ठेकेदाराकडून दुरूस्ती करून त्याच्यावर लाखो रूपय खर्च केला जातो. परंतु दुरूस्ती नियमित करून विद्युत पुरवठा खंडीत होत असेल तर दुरूस्तीचा काय फायदा असा सवाल आता नागरिक विचारत आहेत.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपये देण्याची भाजपाची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ०५ सप्टेंबर-**

मागील चार दिवसापासून अतिवृष्टी मुळे मुदखेड तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याच्या शेतीतील नुकसान झाल्यामुळे मुदखेड तालुका ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये देण्यात यावे यासाठी दि.४ सप्टेंबर २०२४ रोजी मुदखेड तालुका व शहर भाजपाच्या वतीने तहसील कार्यालयात येथे निवेदन देण्यात आले.

मागील चार दिवसापासून मुदखेड तालुक्यात मोठ्या प्रमाणात पावसाने थैमान मांडला असून सदरील अतिवृष्टीमुळे मुदखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. तसेच विमा कंपनी मार्फत विमा क्लेम करणे बंधनकारक आहे. शेतकऱ्यांना ७२ तासात ऑनलाईन विमा क्लेम करण्यासाठी अवधी असते परंतु सततच्या पावसामुळे लाईट व इंटरनेट सेवा सतत खंडित होत असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. तसेच कंपनीमार्फत दिलेला हेल्पलाइन नंबर १४४४७ हा पूर्ण पणे व्यस्त व लागत नसल्यामुळे शेतकऱ्यांना विमा क्लेम न करता शेतकऱ्यांना आपल्या कार्यालयामार्फत सरसकट पंचनामे करून विम्याची मिळणारी रक्कम अदा करण्यात यावे

तसेच मुदखेड तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना प्रत्येकी ५०,००० हजार रुपये देण्यात यावे असे निवेदन मुदखेड भाजपाच्या वतीने तहसील कार्यालय येथे देण्यात आले आहे.यावेळी उपस्थित असलेले भाजपा जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड, मारोती पाटील शंखतीर्थकर, संजय सोनटक्के, संजय आऊलवार, रामसिंग चव्हाण, मारोती जाधव,भीमराव पाटील कल्याणे, माधव पाटील कदम, कानोबा बिस्मिल्ले, संतोष पाटील गाडे,मनोज कमटे,ईश्वर पिन्नलवार,चांदु बोकेफोड, किशोर पारवेकर,गुलाब पाटील सुर्यवंशी, प्रकाश सूर्यवंशी, प्रभाकर पांचाळ, ऋषी पारवेकर, अमोल आबादार ,शिवा तरोडेकर, संदीप मोडवान, सुशील मंगल, गोविंद गुड्डमवार, संतोष येरपलवार, चंद्रकांत येगुरले, यांच्यासह भाजपा कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

### राष्ट्रपतींच्या हस्ते भिक्खू संघास चिवरदान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०५ सप्टेंबर-**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते भिक्खू संघाला चिवरदान करण्यात आले. तसेच भिक्खू संघाकडून त्यांना बुद्ध मूर्ती भेट देण्यात आली. डॉ. भदंत उपगुप्त महाथेरो, भदंत बोधिपालो महाथेरो, अखिल भारतीय भिक्खू संघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष भदंत पंयाबोधी थेरो, भदंत पय्यानंद थेरो, भदंत नागसेनबोधी थेरो, भदंत सत्यपाल थेरो, भदंत करुणानंद थेरो, भदंत महाविरो, भदंत धम्मशील थेरो आदी भिक्खू संघ उपस्थित होता.

## ग्रामिण पोलिसांनी कत्तलीसाठी जाणारे गोवंश पकडले

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०५ सप्टेंबर-**

ग्रामीण पोलिसांनी कत्तलीसाठी जाणारे गोवंशयी जातीचे १८ बैल व एक आयचर वाहन असा एकूण १९ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची कारवाई दि.४ सप्टेंबर रोजी धनेगाव येथे केली.

बोंढार ते धनेगाव मार्गावर एका वाहनात कत्तलीसाठी गोवंशाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन ग्रामीण पोलिसांच्या पथकाने धनेगाव येथे आयचर क्र.एमएच-२०-इएल-७८८७ यास दि.४ सप्टेंबर रोजी पहाटे चारच्या सुमारास थांबविले असता त्यामध्ये गोवंशीय जातीचे १८ बैल आढळून आले. पोलिसांनी या प्रकरणी शेख फिरोज रब्बानी, कुरेशी अबूजर बशीर, जावेद अजीज शेख, शेख गुलाम रसुल शेख सर्व रा.बोरगाव ता.सिल्लोड जि.संभाजीनगर व हबीब खान हुसेन खान रा.जळगाव यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, पोहेकॉ. शेख सत्तार, पंचलिंग यांनी पार पाडली.

## जबरी चोरी प्रकरणातील आरोपीस अटक ; तीन लाखांचा ऐवज जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०५ सप्टेंबर-**

जबरी चोरीच्या प्रकरणातील एका आरोपीस भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने दि.४ सप्टेंबर रोजी ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून ४४ ग्रॅम सोन्याचे तीन गंठण जप्त केले आहेत.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरीची घटना घडली होती. या घटनेतील आरोपी अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथे स्पेशल आलू बिर्याणी हॉटेलवर असल्याची माहिती मिळताच भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने मालेगाव येथे जावून मुकेश गजानन कल्याणकर रा.मालेगाव यास अटक केली. त्याची कसून चौकशी केली असता गणेश दिलीप धबाले, राहुल जाधव व यश चित्तडवाड या



तिघांनी मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून ४४ ग्रॅम सोन्याचे तीन लाख २१ हजार ५२७ रुपये किंमतीचे दागिणे जप्त केले.

हि कारवाई पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, पोहेकॉ. गजानन किडे, प्रदीप गर्दनमारे, ओमप्रकाश कवडे, सूर्यभान हासे, नवनाथ गुट्टे यांनी पार पाडली.

## कंधार-लोहा तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या : प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, ०५ सप्टेंबर-**

लोहा,कंधार तालुक्यात अतिवृष्टीमुळे तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे खरीपांच्या पिकाचे मोठे नुकसान झाले असून कापूस,हळद,तूर,ज्वारी, मुग,उडीद,भाजीपाला या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतीचे तात्काळ पंचनामे करुन कंधार,लोहा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करुन सरसगट शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी प्रा. डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांनी कंधार तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे.

लोहा-कंधार तालुक्यात अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे जमिनी पाण्याखाली गेल्याने हाताला पीक गेल्यामुळे शेतकरी अस्मानी संकटात सापडला आहे.७२ तासांमध्ये झालेल्या नुकसानीची ऑनलाईन नोंद करण्याचे प्रशासन सांगत आहे.पण ऑनलाईन साईट चालत नसल्याने शेतकरी हातबल होत आहेत. ही जाचक अट रद्द करून सरसकट पंचनामे करून दोन्ही तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी.

२०२३ वर्षातील पिकांची आणेवारी ५० टक्के च्या आत असूनही अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना मागील वर्षाचा पिकविमा मिळाला नाही. नांदेड जिल्ह्यात लोहा,कंधार तालुका वगळता सर्व तालुक्यांना पिकविमा मिळाला पण या दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्याला पिकविमा मिळाला नसल्याने या शेतकऱ्यावर अन्याय झाला आहे.शासनाने मागील वर्षाचा २०२३ चा पिकविम्यासह या वर्षाचा पिकविमा व नुकसान भरपाई त्वरित देऊन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनातून अशी मागणी केली आहे निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री,महसूल मंत्री,जिल्हाधिकारी नांदेड,जिल्हा कृषी अधिकारी नांदेड,कंधार उप विभागीय कार्यालय यांना देण्यात आल्या आहेत.



निवेदनावर बाबाराव पा.शिंदे,कटीराम पा.कदम,भीमराव वंजे,पंडितराव पेठकर, माधवराव पिकविमा मिळाला पण या दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्याला पिकविमा मिळाला नसल्याने या शेतकऱ्यावर अन्याय झाला आहे.शासनाने मागील वर्षाचा २०२३ चा पिकविम्यासह या वर्षाचा पिकविमा व नुकसान भरपाई त्वरित देऊन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनातून अशी मागणी केली आहे निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री,महसूल मंत्री,जिल्हाधिकारी नांदेड,जिल्हा कृषी अधिकारी नांदेड,कंधार उप विभागीय कार्यालय यांना देण्यात आल्या आहेत.

निवेदनावर बाबाराव पा.शिंदे,कटीराम पा.कदम,भीमराव वंजे,पंडितराव पेठकर, माधवराव पेठकर,माधव भालेराव,उद्धव पाटील लाडेकर,सरपंच आत्माराम पा.लाडेकर,राजीव पाटील डफडे,विठ्ठल डफडे,आकाश डफडे,माधव लुंगारे,राजीव लुंगारे शिवाजी पा.भुत्ते,हनमंत आनकाडे,शामराव गायकवाड,विलास सांगवे,विठ्ठल भुत्ते,राजू तोरणे, ऋषिकेश तोरणे,विकास गायकवाड,आधिच्या स्वाक्षऱ्या आहेत.